# मराठी साहित्य संमेलनात छत्रपती शिवाजी महाराज उपेक्षितच!

## शिवचरित्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विजयराव देशमुख यांची खंत

■ जळगाव । प्रतिनिधी

वास्तविक छत्रपती शिवरायांच्या जीवनावर मराठी भाषेत अनेक चरित्रे, नाटके, कादंबऱ्या, कथा, प्रवासवर्णने, काव्य, पोवाडे, संशोधनपर साहित्य, बखरी असे विविध प्रकारचे साहित्य निर्माण झाले पण दुर्दैवाने आजवर झालेल्या ९६ मराठी साहित्य संमेलनामध्ये एकाही संमेलनात महाराजांवरील साहित्यावर एखादा स्वतंत्र परिसंवाद, विवेचन, चर्चा झाली असे दिसत नाही ही अत्यंत खेदाची बाब आहे. जिथे प्रत्यक्ष शिवचरित्र घडले त्या महाराष्ट्रातच अशा संमेलनांनी महाराजांच्या कार्याची उपेक्षा करायची हे काहीसे क्लेशदायक वाटते .आपणच जर कुठल्याही कारणाने अशी उपेक्षा करणार असू तर विश्व पातळीवर हे शिवचरित्र कसे पोहोचेल याचा सर्वांनी विचार करावा असे आवाहन संमेलनाध्यक्ष विजयराव देशमुख यांनी केले.



जळगाव शहरातील नुतन मराठा महाविद्यालयात अखिल भारतीय श्री शिवचरित्र साहित्य संमेलनाचे उद्घाटन तंजावरचे श्रीमंत शिवाजी राजे भोसले यांच्याहस्ते करण्यात आले. या याप्रसंगी आ. राजूमामा भोळे, उद्योजक अशोकभाऊ जैन, संमेलनाध्यक्ष विजयराव देशमुख (नागपूर), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.पी.देशमुख, कार्याध्यक्षा केतकी पाटील यांच्यासह आदी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, पराक्रम, विचार आजही प्रेरणादायी आहेत. ते पुढच्या पिढीसाठी नक्कीच कामी येतील अशी सुर उपस्थित मान्यवरांकडून निघाला.. सार्ध त्रिशती श्री शिवराजाभिषेक महोत्सवाचे औचित्य साधून इतिहास प्रबोधन संस्था महाराष्ट्र व नुतन मराठा महाविद्यालय जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पहिल्या अखिल भारतीय श्री शिवचरित्र साहित्य संमेलनाचे उद्घाटक श्रीमंत शिवाजीराजे भोसले तंजावर, स्वागताध्यक्ष आ. राजूमामा भोळे, स्वागत सचिव किरण बच्छाव, कार्याध्यक्ष डॉ. केतकी पाटील आयोजक प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव देशमुख, डॉ. रवींद्र पाटील, भारती साठे, शंकर जाधव, प्राध्यापक डॉक्टर मधुकर साठे, प्राध्यापक डॉक्टर राजेंद्रसिंह देवरे, यांनी पहिल्या अखिल भारतीय श्री शिवचरित्र साहित्य संमेलनासाठी संमेलन अध्यक्षपद देऊन माझ्या शिवकार्याचा आपण जो सन्मान केला त्याबद्दल आभारी असल्याचे विजयराव देशमुख यांनी सांगितले



### महाराजांचा लौकीक व आत्मीक जीवन पवित्र

विजयराव देशमुख पुढे म्हणाले की , शिवाजी महाराज केवळ महाराष्ट्राचे किंवा देशाचे नव्हे तर साऱ्या विश्वातील एक आदर्श महापुरुष आहेत. शिवाजी महाराजांची तुलना अलेक्झांडर, सिझर, नेपोलियन, शार्लमान, क्रॉमबेल, वॉशिंग्टन इ. लोकोत्तर वीरांशी केली जाते पण चारित्र्य, ध्येयनिष्ठा, नीतिमत्ता, शौर्य, दूरदृष्टी, प्रतिभा डोळस आणि आदर्श राजनीती, कर्तृत्व आणि युगानुकूल महत्त्व इ. गुणविशेषांचे अनसेयू वृत्तीतून चिंतन केले तर महाराज या सर्वापेक्षा नक्कीच सरस ठरतात. महाराजांची योग्यता स्वयंसिद्ध आहे. कै. राजवाडे म्हणतात त्याप्रमाणे, अलेक्झांडर प्रमाणे महाराजांनी आपल्या स्नेह्यासोबत्यांना ठार मारले नाही. सिझर प्रमाणे आपल्या पत्नीस सोडून दिले नाही. नेपोलियन बोनापार्टने डफ डांगियांचा जसा अन्यायाने वध केला तसा महाराजांनी कोणाचाही केला नाही. क्रॉमवेलने निरपराध आयरिश लोकांची जशी भीषण कत्तल केली तशी महाराजांनी संपूर्ण देशात कुठेही कत्तल केली नाही. महाराजांचे लौकिक व आत्मिक जीवन निष्कलंक व पवित्र होते. महाराजांचा संघर्ष कुणा जातीशी व धर्माशी नव्हता तर त्यांचे कार्य प्रकृती विरुद्ध विकृतीच्या संघर्षात प्रकृतीच्या पुनःस्थापनेसाठी होते. एकीकडे ठार मारण्याच्या निर्धाराने आलेल्या अफजलखानाला भेटीत महाराजांनी त्याने पहिला हल्ला केल्यानंतर, क्षत्रिय धर्मन्यायानुसार त्याचा वध केला तर दुसरीकडे गोवळकोंड्याच्या कुतुबशहाला (तो अफजलखान प्रसंगावरून पूर्ण घाबरून गेल्याने) निर्भयतेचे वचन देऊन प्रेमालिंगन दिले. यवनांशी संघर्ष करीत असताना स्वकियांशी त्यांना संघर्ष करावा लागला तो त्यांनी कठोरपणे केल्याचेही त्यांनी सांगितले.

# शहादा तालुक्यात ९५.६४ टक्के मतदान

■ शहादा, ता.प्र. -

नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी येथील तहसील कार्यालयात दोन मतदान केंद्रांवर शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. तालुक्यात ९५.६४ टक्के मतदान झाले.

येथील तहसील कार्यालयात नाशिक विभागीय शिक्षक मतदारसंघाचा निवडणूकीत मतदान केंद्र क्रमांक चार व पाच असे दोन मतदान केंद्र होते. मतदान केंद्र क्रमांक चार वर गटविकास अधिकारी राघवेंद्र घोरपडे तर मतदान केंद्र क्रमांक पाच वर पालिकेचे मुख्याधिकारी दिनेश सिनारे केंद्राध्यक्ष होते. दोन्ही केंद्रांवर सकाळपासूनच मतदारांनी मतदानासाठी रांगा लावल्या होत्या. ज्या शाळा दुपारच्या सत्रात भरतात त्या शाळेतील कर्मचाऱ्यांनी सकाळीच मतदानाचा हक्क बजवला तर अनेक मतदानासाठी शाळा सकाळच्या सत्रात भरवल्याने दुपारी मतदानासाठी मोठ्या रांगा लागल्या होत्या. शेवटपर्यंत मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यावेळी उमेदवारांचा समर्थकांनी मंडप लावून दिवसभर मतदान केंद्रावर हजेरी लावली. तर संपूर्ण सुशिक्षित मतदार असल्याने वाद, हुज्जत, भांडण आदी प्रकार कुठेही घडला नाही. यावेळी पोलीस बंदोबस्तही त

ैनात करण्यात आला होता. शहादा तालुक्यात १२११ पुरुष तर ४२० स्त्री असे एकूण १६३१ मतदार होते. पैकी ११४३ पुरुष तर ४१७ स्त्री असे एकूण १५६० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. एकूण ९५.६४ टक्के मतदान झाले.

# कर्जदारांचा पैसा जमाच केला नाही

## व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा

■ नंदुरबार । दि.२७। प्रतिनिधी

फायनान्स कंपनीकडे कर्जदारांनी केलेला भरणा न करता स्वत:कडे ठेवून फसवणूक केल्याप्रकरणी नम्रा फायनान्स कंपनीच्या व्यवस्थापकाविरुद्ध नवापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नवापूर येथील नम्रा फायनान्स कंपनीच्या शाखेत दि.१० फेब्रुवारी २०२४ पर्यंत कर्जदारांनी भरणा केलेल्या शिल्लक रकमेपैकी १ लाख ४० हजार रुपये नम्रा फायनान्स तत्कालीन मॅनेजर आरोपी भिमराव भामरे याने कंपनीच्या बँक खात्यात जमा न करता सदर रक्कम स्वत:कडे ठेवून कंपनीची फसवणूक करुन अपहार केला आहे. याबाबत नितीन बाबासाहेब गवारे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार नवापूर पोलीस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज पाटील करीत आहेत.

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**

मध्यवर्ती कार्यालय: हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ, प्रभादेवी, मुंबई-४०००१३.
दूरध्वनी क्र. ०२२ - ६९३२८१११/ ६९३२८१८१
E-mail: mlwbconteeg@gmail.com, संकेतस्थळ: www.public.mlwb.in

**नोटीस**

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये नोटीस देण्यात येते की, खाली दर्शविलेल्या आस्थापना/ संस्थांमधील कामगार/ कर्मचाऱ्यांच्या दिनांक ३१ डिसेंबर २०२० पर्यंतच्या पगार, बोनस वगैरेसारख्या अवितरीत संचयनाच्या रकमा त्यांना न दिल्या गेल्याने मंडळाकडे दिनांक ३१ मार्च २०२४ पर्यंत जमा झालेल्या आहेत. अशा व्यक्तींच्या नावांची यादी इत्यादी तपशील महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३)(अ) अन्वये संबंधित आस्थापनेच्या/संस्थेच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावा.

संबंधित व्यक्तींना सदर रकमेचा परतावा मिळण्यासाठी त्यांचे संपूर्ण नाव व पत्ता, आस्थापना/संस्थेचे नाव व पत्ता, तिकीट नंबर, हुद्दा व कोणत्या महिन्याची व वर्षाची रक्कम आहे इत्यादी तपशील देऊन आपल्या आस्थापनेच्या शिफारस पत्रासह कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्याकडे वरील पत्यावर दोन प्रतीत अर्ज सादर करावा.

| आस्थापनेचे नांव | रक्कम |
|---|---|
| धुळे / जळगाव | रुपये पैसे |
| धुळे | |
| द इंडियन ह्युम पाईप कं. लि. | १२००३.०० |
| जळगाव | |
| हिताची एस्टेमो ब्रेक सिस्टमं इंडिया प्रा. लि. | ८१५१३१.०० |
| एम.एस.आर.टी.सी. (जळगाव डिव्हिजन) | २१७४३.०० |

स्वाक्षरीत/-
कल्याण आयुक्त
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

उपरोक्त जाहीर केलेल्या अवितरीत संचयनाच्या न दिल्या गेलेल्या पगार वगैरे सारख्या रकमांमध्ये मंडळाकडे दिनांक ३१ मार्च २०२१ पर्यंत जमा झालेल्या आणि मागील सलग तीन वर्ष नोटीसीद्वारे जाहीर केलेल्या रकमांचा महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये समावेश करण्यात आलेला नाही. तसेच या रकमांमध्ये दिनांक ०१.०४.२०२१ ते ३१.०३.२०२४ या तीन वर्षाच्या कालावधीत मंडळाकडे जमा झालेल्या सर्व रकमांचा समावेश करण्यात आलेला आहे.

पान ३ वरुन ...

## हो कुछ पर हार नही मानुंगा

असावे. याच संघाच्या बाबतीत ही खिलाडूवृत्ती का अनुभवाला आली? प्रेक्षकांचे या संघावर इतके प्रेम का जडले? या संघाची कामगिरी म्हणजे आव्हानांवर मात करण्याची, संकटाना सामोरे जाण्याची आणि प्रतिकूलतेलाही अनुकूल बनवण्याची प्रेरणादायी गोष्ट आहे. त्यांच्या क्रिकेट क्लबची स्थापनाच रेफुजी कॅम्पमध्ये झाली. त्यांच्या देशावर वर्षानुवर्षे अमेरिकेचे वर्चस्व होते. कालांतराने त्यांनी माघार घेतली. मग कट्टर तालिबानचे सरकार स्थापन झाले. त्यांनी सगळ्याच खेळांवर बंदी घातली पण नंतर क्रिकेट बंदीमुक्त केले. देशांतर्गत वातावरण अस्थीर, कमालीची गरीबी आणि अनाथपण या खेळाडूंच्या वाट्याला आले. त्यांनी हार मानली असती तरी ती समर्थनीयच ठरली असती. पण तसे घडले नाही. ते कोणत्याही प्रतिकूलतेसाठी रडत बसले नाही की दोषांचे रडगाणे लावले नाही. त्यांना संताप आला नसेल का? असहाय वाटले नसेल का? कधीच निराशा दाटून आलीच नसेल का? पण ते जीवतोड मेहनत घेऊन खेळातून त्याला प्रत्युत्तर देण्याचा सतत प्रयत्न करतात. विश्वचषक स्पर्धेतील प्रत्येक सामना हा त्याची साक्ष आहे. त्यांची वाटचाल प्रेरणादायी आहे. लोकांना अनेक समस्या असतात. विद्यार्थ्यांना अपयशाचा, तरुणांना बेरोजगारीचा सामना करावा लागतो. अनेक जण निराश होतात आणि परिस्थितीला दोष देऊन हार मानतात. पण त्यावर मात करण्यासाठी लढत राहाणे हाच एकमेव मार्ग आहे हे या संघातील खेळाडूंनी दाखवून दिले. मानवातील विजिगिषु वृत्तीचा परिचय करुन दिला. 'क्या हार मैं, क्या जीत मैं, किंचित नही भयभीत मैं, कर्तव्यपथ पर जो भी मिला, यह सही और वो भी सही, वरदान नही मागुंगा, हो कूछ पर हार नही मानूंगा', असे अटलबिहारी वाजपेयी एका कवितेत म्हणतात.

## विहिर धसून दाम्पत्याचा मृत्यू : दोघे बचावले

शेतकरी रेबा पांगव्या पावरा (वय ६०) हे पत्नी मीनाबाई (वय ५५) यांच्यासोबत लालमाटी - जोयदा शिवारात शेतात पेरणीचे काम करत होते. त्यादरम्यान त्यांना विहीरीत काही तरी पडल्याचा जोराचा आवाज आला. त्यामुळे दोघांसह संतुबाई भिकला पावरा (वय ५०) ही महिला तिच्या दिड वर्षाच्या मुलासह विहीरीजवळ गेले. त्याचदरम्यान विहीरीचा एक मोठा भाग अचानक ढासळल्याने सर्व विहीरीत पडले. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी रेबा पावरा व मीनाबाई पावरा ढिगाऱ्याखाली दबले गेले. तर संतुबाई पावरा व तीचा दिड वर्षाचा मुलगा बचावले. घटनेनंतर बचावकार्य युद्ध पातळीवर सुरू करण्यात आले. रेबा पावरा आणि मीनाबाई पावरा या दाम्पत्याला मृत अवस्थेत शिरपूर उपजिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे सांगवी गावात शोक व्यक्त केला जात आहे.

## आनंदखेडेनजीक पोलिसाचा अपघातात मृत्यू

त्यांच्या दुचाकीने जीजे १२/७४४७ क्रमांकाच्या ट्रकला मागाहून धडक दिली. त्यात ते गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच ग्रामस्थांसह मित्रपरिवारासह घटनास्थळी धाव घेतली. त्यांना हिरे रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. पोकाँ शिंपी यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, ५ वर्षांची मुलगी, ३ वर्षांचा मुलगा असा परिवार आहे.

**बुधवार २६/०६/२०२४**

मधुर नाईट -७००-७५-२५८
धनलक्ष्मी नाईट-१३४-८२-४८०
मेन बाजार -७८०-५२-५८९
मिलन ना.-७७९-३१-५८८

**शुक्रवार २७/०६/२०२४**

मधुर मॉर्निंग-१७८-६९-१९९
मधुर डे-११८-०८-५५८
मधुर नाईट-१२७-०
धनलक्ष्मी डे-४७८-९२-२३७
धनलक्ष्मी नाईट-१५६-२
मेन बाजार -
कल्याण-१३०-४७-११५
मिलन डे -२३६-१६-८८०
मिलन ना.-

### कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| ०५-०५ २०२४ ११-०५- २०२४ | १४७ २७ २५० | ५८९ २१ ३३५ | ३५७ ५४ ३४७ | ३५९ ७९ १८० | ६६८ ०१ ४८९ | १५८ ४४ ७८९ |
| १३-०५ २०२४ १८-०५- २०२४ | २३४ ९८ ३६९ | १४९ ४० ५६९ | ३४७ ४५ २४९ | ५६८ ९६ ४५७ | २६७ ५३ ७७९ | २३८ ३० १९० |
| २०-०५ २०२४ २५-०५- २०२४ | १५६ २६ १५० | ३४९ ६६ ११४ | १३३ ७० ११८ | १३६ ०२ ५८९ | ३९९ १६ २४० | ३४७ ४२ १४७ |
| २७-०५ २०२४ १-०६- २०२४ | ३७८ ०० ५७८ | २५९ ६३ १२० | १२६ ९४ १३० | ४५५ ४४ ३३८ | ४०० ४६ १७९ | १५७ ३४ ६८० |
| ०३-०६ २०२४ ०८-०६- २०२४ | ६८८ २७ ८९० | १७८ ६३ ५९९ | ७९९ ५० १२७ | ११३ ५३ ५९९ | २६९ ६२ ३९० | २७७ ६२ ३९० |
| ०३-०६ २०२४ ०८-०६- २०२४ | ६८८ २९ ३७९ | २२३ ७५ ६९० | १४४ ९० ३८९ | ११६ ८२ २२८ | ३५९ ७० ६७७ | ५५६ ६५ २४९ |
| १७-०६ २०२४ २२-०६- २०२४ | ६६९ १५ २४९ | ४८० २५ १४० | ३५९ ७५ ७८० | २३७ २६ ६०० | २४७ ३१ १४६ | २३४ ९८ १७० |
| २४-०६ २०२४ २९-०६- २०२४ | ७८९ ४५ १६८ | ६६० २६ २६८ | ३४९ ६४ १४९ | १३० ४७ ११५ | | |

### मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५-०५ २०२४ ११-०५- २०२४ | ६०० ६४ १५८ | १७९ ७९ १३५ | ११६ ८३ ६७० | ६८८ २९ १९९ | ९०० ९४ ११२ | १२४ ७७ २६९ | ● |
| १३-०५ २०२४ १९-०५- २०२४ | २७९ ८२ १३८ | १४७ २९ २३४ | १६७ ४९ ३७९ | ४५७ ६५ १४० | ३३४ ०८ १७० | ५९९ ३७ ११५ | ● |
| २०-०५ २०२४ २६-०५- २०२४ | ११४ ६५ ६९० | १६० ७७ ३४० | १३५ ९४ ७८९ | २५७ ४३ ६७० | ६८९ ३५ २६७ | २३८ ३८ १७० | ● |
| २७-०५ २०२४ १-०६- २०२४ | ३३९ ५९ २७० | ४७९ ०२ २४६ | ९९० ८६ २५९ | ३८० १६ १७८ | ३४४ १० १३६ | ५७७ ९८ ४४० | ● |
| ०३-०६ २०२४ ०९-०६- २०२४ | १२७ ०१ १४६ | २४० ६२ १४७ | ३४९ ६९ ३३३ | ३४५ २५ २६७ | ५८८ १२ ४८० | २३४ ९४ २५७ | ● |
| ०३-०६ २०२४ ०९-०६- २०२४ | ४६८ ८६ ८८० | १६७ ४४ १५८ | १४६ १५ २५८ | ६७० ३९ ६६७ | १७८ ६० ३७० | ३४० ७८ ५५८ | ● |
| १७-०६ २०२४ २३-०६- २०२४ | ३३४ ०० २३५ | २९० १४ १५८ | ४९० ३२ १४७ | १४९ ४७ ४६७ | १२८ १० २३५ | ४४५ ३१ १२८ | ● |
| २४-०६ २०२४ २९-०६- २०२४ | ११२ ४० १४५ | ८८० ६६ १२३ | ३३७ ३४ १६७ | २३६ १६ ८८० | | | ● |

### मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| ४६८ ८२ १२९ | ४०० ४० २४४ | १३७ १७ ४४९ | २३९ ४३ २४७ | २७९ ८९ ४७८ | ४७८ ९१ १३७ |
| ४४५ ३५ १४० | १६७ ४३ ३४६ | १६७ ४६ ८८० | ५९० ४२ ५८९ | ३५० ८४ १५८ | १४९ ४७ ५५७ |
| ५९० ४० १२७ | २४६ २५ ६९० | ३५० ८६ ३४९ | २४९ ५७ १६० | ७८९ ४४ १३९ | २४९ ५७ २५० |
| ३८० ११ ४७८ | १७० ८९ ३७९ | १५७ ३५ २३० | १४८ ३२ ६७९ | २६९ ७६ २६८ | २३० ५९ ५६८ |
| ५६७ ८५ २६७ | ३५८ ६३ १४८ | ६८० ४३ ७८८ | १४८ ३० २८० | १३७ १५ ८८९ | ५५७ ७९ ३६० |
| ३४९ ६७ ३४० | ३६० ९५ ६९० | २३६ १५ २३० | २७८ ७२ १३८ | ३६९ ८९ १३५ | ६८० ४८ १८९ |
| ३७० ०१ २३६ | ६६८ ०० १९० | ३९० २२ २०० | १७० ८८ ५६७ | १३७ १३ १२० | २६६ ४२ ७७८ |
| ५६९ ०० ५७७ | १७० ८६ ७९० | ७७९ ३१ ५८८ | | | |

**नशिबाची परीक्षा**

शुक्रवार २८/०६/२०२४

* मिलन डे *
१४९ २४८ २२० — ४-२ — १५६ २४६ २२८ | सिंगल ४-८-९
जोड ४६-९३-८१-०२-२७

* कल्याण बाजार *
१६९ २६८ ३६७ — ६-१ — १४६ ४७० ५६० | सिंगल ६-३-७
जोड ६०-२१-३४-५७-१८

* मुंबई (मेन) बाजार *
३९० ४८० ५७० — २-० — १९० २८० ४६० | सिंगल २-४-७
जोड २१-६०-४८-७९-०३

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६

**क्लासिफाईड**

**दारुबंदीचा गुरुमंत्र**

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ. पालवे ॲडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इजंक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरीबांसाठी फी मध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२५)(CRINV-2324JL/CRG00555)

**१००% व्यसनमुक्ती**

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२, www.drpalve nashamuktikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही.एम./०९/०१/२५) (CRINV-2324JL/CRG00554)

**उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी**

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघे दुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकन गुनीया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो. नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही.एम./ ०९/०१/२५) (CRINV-2324JL/CRG00556)

**देशदूत**

धुळे आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.५/-प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै. 'देशदूत'च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै. 'देशदूत', 'देशदूत कार्यालय' राणी मेडीकल शेजारी, ग.नं. ६ ,धुळे ४२४००१. संपर्क धुळे-२३७९१४ फॅक्स २३८९१४.

**सूचना**

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नंदुरबार/धुळे । शुक्रवार, दि. २८ जून २०२४ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## तालिका अध्यक्षांची नियुक्ती

**मुंबई ।** विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनासाठी गुरुवारच्या पहिल्या विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विधानसभेच्या तालिका अध्यक्षांची घोषणा केली. विधानसभा सदस्य संजय शिरसाट, कालिदास कोळंबकर, अमीन पटेल, डॉ.किरण लहामटे, समाधान आवताडे यांची तालिका अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. दरम्यान, आज विधानसभेत पी. एन. पाटील-सडोलीकर, प्रतापराव भोसले, मीनाक्षी पाटील, माजी राज्यमंत्री गंगाधर गाडे, टी. पी. कांबळे आदींच्या निधनबद्दल शोकप्रस्ताव मांडण्यात आला.

## घाटकोपर दुर्घटनेच्या चौकशीसाठी समिती

**मुंबई ।** मुंबईतील घाटकोपर येथे रेल्वे जमिनीवर असलेले होर्डिंग पडून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी उच्चस्तरीय चौकशीसाठी राज्य सरकारकडून समिती नेमण्यात आली आहे. उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमण्यात आली आहे. घाटकोपर येथील होर्डिंग दुर्घटनेत १६ जणांचा मृत्यू झाला आहे. यामुळे बेकायदेशीर होर्डिंगचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरातील जाहीरात फलक, शासकीय किंवा रेल्वे मालमत्तेवरील जाहीरात फलक यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर चिंता निर्माण झाली आहे.

# दादांचे शिलेदार माघारी?

## पाच आमदारांनी घेतली जयंत पाटलांची भेट

**मुंबई ।** अजित पवार गटाचे काही आमदार शरद पवार गटात परत जाणार असल्याची गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू आहे. त्या चर्चांना आता बळ मिळणारी घटना घडली आहे. अजित पवार गटाच्या पाच आमदारांनी जयंत पाटलांची भेट घेतल्याची माहिती आहे. यामध्ये पश्चिम महाराष्ट्रासह नाशिकच्या दोन आमदारांचा समावेश असल्याने अजित पवार गटामध्ये चिंतेचे वातावरण आहे.



लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर शरद पवार गटाच्या संपर्कात अजित पवारांचे आमदार असल्याची चर्चा होती. तशा प्रकारचा दावा जयंत पाटील आणि आमदार रोहित पवारांकडून करण्यात येत होता.

शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे विधीमंडळाच्या कामकाजासाठी आले होते. त्याचवेळी एका कार्यालयात अजित पवार गटाच्या पाच आमदारांनी त्यांची भेट घेतल्याची माहिती समोर येत आहे.

### नाशिकचे दोन आमदार स्वगृही परतणार?

जयंत पाटलांची भेट घेणाऱ्या आमदारांपैकी दोन आमदार हे नाशिक भागातले असल्याची माहिती आहे. लोकसभेच्या निवडणुकीवेळी कांदा प्रश्न पेटला होता, त्याचा फटका महायुतीला बसला आणि अनेकांना पराभवाला सामोरे जावे लागले. ही परिस्थिती पाहता नाशिकमधील दोन आमदारांनी पुन्हा शरद पवारांकडे जाण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा सुरू आहे. आमदार रोहित पवार हे यावर प्रतिक्रिया देता ना म्हणाले, जयंत पाटील हे अनुभवी नेते आहेत. कधी कुठले कार्ड काढायचे हे त्यांना माहिती आहे. ही तर फक्त सुरूवात आहे. शरद पवार हे महायुतीच्या नेत्यांपेक्षा कितीतरी पटीने पुढे आहेत हे लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने समोर आले आहे. जे कुणी चांगले असतील त्यांचे स्वागत आहे. पण ज्या आमदारांनी उन्माद केला, लोकभावनेच्या विरोधात भूमिका घेतली त्यांच्यावर शरद पवार, जयंत पाटील निर्णय घेतील.

### दादांना भाजप संपवतेय-रोहित पवार

भाजप लोकनेत्यांना संपवतात, तीच भूमिका अजित पवारांच्या बाबत घेतली जात आहे असे सांगत रोहित पवार म्हणाले की, आता अजित पवारांना जाणूनबुजून बाजूला केले जात आहे. अजित पवारांच्या आमदारांना फक्त शरद पवारांची मते खाण्यासाठी उभे करण्याची भूमिका भाजपची दिसतेय. पण आमदार तितके खुळे नाहीत. त्यामुळे भाजपसोबत राहिले तर अजित पवारांना २० ते २२ जागा मिळतील. जर स्वतंत्र लढले तर सर्व ठिकाणी त्यांचे आमदार उभे राहतील, पण ते फक्त मते खाण्यासाठी असतील, त्यांच्यातील कुणीही निवडून येणार नाही.


## संपादकीय

### हो कुछ पर हार नही मानुंगा

आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धा सुरु आहे. खेळात विजय आणि पराभव सुरुच असतो. तथापि पराभवातही जिंकणे कशाला म्हणतात हे अफगाणिस्तानच्या संघाने दाखवून दिले. विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत या संघाचा पराभव झाला. त्याचे संपूर्ण क्रिकेटविश्वाला दुःख झाले असणार. वास्तविक प्रत्येक संघाचे प्रसंशक प्रेक्षक असतात. त्यांच्या पसंतीचा संघ जिंकला किंवा हारला की त्यांच्याकडून तशाच प्रतिक्रिया उमटतात. अफगाणिस्तानचा संघ मात्र याला अपवाद ठरला. उपांत्य फेरीतील त्यांच्या पराभवाने तमाम प्रेक्षकांना दुःख झाले. या स्पर्धेत या देशाने एका सामन्यात जेव्हा बांगलादेशाचा पराभव केला तेव्हा इंग्लडचा माजी खेळाडू जोनाथनने अफगाणिस्तानच्या गुरबाजला खांद्यावर घेऊन मिरवले. वेस्टइंडिजचा माजी खेळाडू ब्राव्होच्या डोळ्यात आनंदाश्रू होते आणि स्टेडियममधील सगळे प्रेक्षक तो विजय साजरा करत होते. याच स्पर्धेत अफगाणिस्तानच्या संघाने बलाढ्य ऑस्ट्रेलियाच्या संघाला धूळ चारली. उपांत्य फेरीत धडक हेच त्यांच्यासाठी स्वप्नवत

पान २ वर »

## लालकृष्ण अडवाणींना रुग्णालयातून डिस्चार्ज



**नवी दिल्ली ।** भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अडवाणी यांच्यावर उपचार करण्यात आले. आता लालकृष्ण अडवाणी यांच्या तब्येतीत सुधारणा झाल्याने एम्स रुग्णालयातून त्यांना घरी सोडण्यात आले आहे. यासंदर्भात डॉक्टरांनी माहिती दिली. ९६ वर्षीय लालकृष्ण अडवाणी यांना बुधवारी सायंकाळी उशिरा अचानक अस्वस्थ वाटू लागले. त्यानंतर त्यांना लगेचच तातडीने एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले. युरोलॉजी विभागातील डॉक्टरांच्या देखरेकीखाली त्यांच्यावर उपचार करण्यात आले. याबाबत बोलताना डॉक्टरांनी सांगितले की, लालकृष्ण अडवाणी यांचे एक छोटे ऑपरेशन करण्यात आले. आता त्यांना बरे वाटत आहे. त्यामुळे त्यांना घरी सोडण्यात आले आहे. दरम्यान लालकृष्ण अडवाणी यांना रुग्णालयात दाखल करताच पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, भाजपा अध्यक्ष जे.पी.नड्डा यांच्यासह मोठ्या नेत्यांनी त्यांच्या तब्बेतीची विचारपूस केली.

## विहिर धसून दाम्पत्याचा मृत्यू : दोघे बचावले

**बोराडी ।** शिरपूर तालुक्यातील लालमाटी-जोयदा शिवारात अचानक विहिर धसल्याने दाम्पत्याचा मातीच्या ढिगाऱ्याखाली दबून मृत्यू झाला. तर सुदैवाने चिमुकल्यासह महिला बचावली आहे. आज दि. २७ रोजी दुपारी ही घटना घडली.

शिरपूर तालुक्यातील सांगवी येथील

पान २ वर »



## राष्ट्रपतींचे अभिभाषण

**नवी दिल्ली ।** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे आज देशाच्या संसदेत दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर अभिभाषण झाले. या भाषणात राष्ट्रपतींनी देशाच्या विकासाचा, मोदी सरकारने केलेल्या विकासकामांचा, राबवलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. त्याचवेळी राष्ट्रपतींनी सीएए, कलम ३७०, नुकत्याच संपलेल्या लोकसभा निवडणुकांचे निकाल, नीट परीक्षा पेपर लीक प्रकरण अशा अनेक मुद्यांवरही भाष्य केले.

## आनंदखेडेनजीक पोलिसाचा अपघातात मृत्यू



**धुळे ।** तालुक्यातील आनंदखेडे गावाजवळ झालेल्या अपघातात साक्री पोलीस ठाण्यात कार्यरत पोलिस कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. आज सकाळी हा अपघात झाला. या घटनेने पोलीस दलासह गावात हळहळ व्यक्त होत आहे.



गुलाब गोविंदा शिंपी (वय ३६ रा. आनंदखेडा ता. धुळे) असे मयत पोलीस कॉन्स्टेबलचे नाव आहे. ते साक्री पोलीस ठाण्यात कार्यरत असून दुचाकीने आनंदखेडे ते साक्री अपडाऊन करायचे. ते आज दि.२७ रोजी सकाळी अकरा वाजेच्या सुमारास दुचाकीने जात असतांना आनंदखेडे गावाजवळच असलेल्या खाडी पुलाजवळ

पान २ वर »








DECLARATION

Here by I declare the my Old Name **ASHOK KUMAR ROOPCHAND JAIN** has been changed to New Name **ASHOK KUMAR RUPCHAND JAIN** so onwards all official must be done, by my new name only.

**ASHOK KUMAR RUPCHAND JAIN**

OLD ADDRESS - POLICE LINE, NEAR SHARDA SAW MILL,TALUKA NANDURBAR-425412 DIST, NANDURBAR

NEW ADDRESS - BAHERPURA, NEAR AGRAWAL BHAVAN NANDURBAR-425412 MAHARASHTRA


# न थांबणारे वादळी युवा नेतृत्व: डॉ.हीनाताई गावित



नंदुरबारसारख्या आदिवासी जिल्ह्यात आवास योजना, हर घर बिजली, उज्वला गॅस यासारख्या योजनांचा लाभ पोहोचवून देत तसेच रेल्वे सुविधा मिळवून देत, कोट्यवधी रुपयांचा रस्ते विकास करीत रचनात्मक विकास कार्य करणाऱ्या संसदरत्न डॉ.हीना गावित यांचं गत दहा वर्षात दिल्ली दरबारात आपलं एक निराळं स्थान निर्माण झालं आहे. खानदेशातली एक आदिवासी कन्या राष्ट्रीय पातळीवर चमकू लागते, ही खरी तर मागील दहा वर्षातली मोठी उल्लेखनीय बाब ठरली असून खानदेशवासीयांचे नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राने डॉ.हीना गावित यांच्या त्या चमकदार वाटचालीने लक्ष वेधून घेतले आहे. युवकांचे प्रेरणास्थान आणि धडाडीचे युवा नेतृत्व म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते, त्या डॉ.हीना गावित आणि या युवा नेतृत्वाला आणखी हजार प्रकारच्या संधी लाभतील आणि पुन्हा राजकारण गाजवून सोडणारी चमकदार कामगिरी त्यांच्या हातून घडेल, हा ठाम विश्वास त्यांच्या लाखो चाहत्यांकडून व्यक्त होणं स्वाभाविक आहे.

**व्यक्तिमत्त्वाची उंची दर्शवणारे प्रसंग**

थांबणार नाही कधीही, ही दौड वादळाची आहे. विझणार नाही कधी, ही वीज झळाळती आहे. या ओळींना साजेसं व्यक्तिमत्व डॉ.हीना विजयकुमार गावित यांच्यात ठासून भरलेलं आहे. वाढदिवस कुटूंब, समाज आणि राष्ट्रप्रती असलेले कर्तव्य नव्या उत्साहाने पार पाडण्याची प्रेरणा देतो. येणाऱ्या काळात तुम्ही लोकांच्या कल्याणासाठी नव्याने समर्पणाने झटत रहा. अशा शब्दात पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी डॉ.हीना गावित यांना मागील वर्षी शुभेच्छा दिल्या होत्या. यातून त्यांच्यातील व्यक्तिमत्वाची उंची लक्षात यावी. अलीकडेच नंदुरबारच्या जाहीर सभेत डॉ.हीना गावित यांचा विशेष उल्लेख करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, ये हमारी लाडली बेटी है. ही मुलगी संसदेत विरोधकांचे चांगलेच छक्के सोडवते. गरिबांच्या सुखदुःखाची ती खरी साथीदार आहे. डॉ. हीना गावित यांच्या चमकदार कामगिरीचा हा बोलका आरसाच म्हणावा लागेल. जनतेशी बांधिलकी मानून सदोदित विकासावर आधारित राजकारण करणारे एवढे प्रभावी युवा नेतृत्व लाभले ही जिल्हयापासून प्रदेशापर्यंतच्या भाजपाची सुद्धा जमेची बाजू आहे.

नंदुरबार लोकसभा मतदार संघाची दुर्दशा थांबवण्यासाठी राजकारणाच्या पदार्पणातच म्हणजे २५ वर्षांपूर्वी महाराष्ट्राचे आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांनी नंदुरबार हा स्वतंत्र जिल्हा अस्तित्वात आणला. एवढेच नव्हे तर कायापालट घडवणारे विकासात्मक परिवर्तन समस्त आदिवासींच्या जीवनात घडवले. अर्थातच महासंसद रत्न मा.खा.डॉ.हीना गावित यासुद्धा आपल्या या वडिलांच्या पाऊलवाटांवरून चालत आहेत. घरकुलांचे रेकॉर्ड ब्रेक वाटप करून दोन लाखाहून अधिक बेघरांना पंतप्रधान आवास मिळवून दिले, उज्वला योजनेतून दोन लाख गृहिणींना मोफत गॅस कनेक्शन मिळवून दिले, स्वातंत्र्यानंतर प्रथमच अतिदुर्गम भागापर्यंत वीज पोहोचवणे, नर्मदा काठावरील शेवटच्या टोकापर्यंत रस्ते विकास करणे, गावागावात हर घर नल योजनाद्वारे पाणी पोहोचवणे यासारखा विकास करून दाखवला.

**कारकिर्दीतील खास वैशिष्ट्ये**

महासंसदरत्न डॉ.हीना गावित यांच्या कारकिर्दीला अशी अनेक प्रकारची खास वैशिष्ट्ये लाभली आहेत, २०१४ यावर्षी समाजकार्यात मग्न असलेल्या युवा नेत्या डॉ.हीना विजयकुमार गावित यांनी नरेंद्र मोदी, राजनाथ सिंह, सुषमा स्वराज, गोपीनाथ मुंडे अशा बड्या नेत्यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश करून राजकारणाला सुरुवात केली आहे. त्यावेळी त्या एम.डी.मेडिसिनची पदव्युत्तर परीक्षा देत होत्या. अशातच त्यांनी त्यांचे वडील मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसभेची उमेदवारी दाखल केली होती. २०१४ ला नरेंद्र मोदी यांनी त्यांच्यासाठी नंदुरबार येथे येऊन पहिली भव्य प्रचार सभा घेतली होती. पहिल्या निवडणुकीतच प्रचंड बहुमताने डॉ.हीना गावित निवडून आल्या. नंदुरबार लोकसभा मतदार संघातून लोकसभेवर निवडून आलेल्या त्या पहिल्या महिला खासदार ठरल्या. त्याचबरोबर संपूर्ण खानदेशातून संसदेत पोहोचलेली पहिली आदिवासी महिला खासदार म्हणून देखील त्यांचा उल्लेख त्यावेळी केला गेला. निवडून आल्यानंतर त्या पहिल्या पाच वर्षात डॉ.हीना गावित यांनी भरीव विकास कामावर आधारित आपल्या नेतृत्वाची विशेष छाप पाडली.

खासदारकीच्या दहा वर्षाच्या कार्यकाळात भाजपाचे नंदुरबार जिल्ह्यात संघटन वाढवण्यासोबतच त्यांनी आदिवासी भागाचे प्रश्न संसदेत मांडण्याचा विक्रम नोंदवला. जनजातीच्या हक्कांचा आवाज बुलंद करणाऱ्या युवा नेत्या म्हणून चोख कामगिरी बजावली. २०१९ ला दमदार विकास कामांच्या बळावर पुन्हा एकदा भाजपाने त्यांना संधी दिली. त्या निवडणुकीत सुद्धा डॉ.हीना गावित यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः प्रचाराला आले होते. शिवाय यंदाच्या म्हणजे २०२४ च्या निवडणुकीत सुद्धा स्वतः पंतप्रधान त्यांच्या प्रचारासाठी आले होते. या गोष्टी त्यांनी दिल्लीत निर्माण केलेले राजकीय वजन अधोरेखित करणाऱ्या आहेत.

**पक्षाच्या वरिष्ठांनी संधी द्यावी**

खासदारकीच्या दुसऱ्या टर्ममध्येसुद्धा डॉ.हीना गावित यांनी विक्रमी विकास कामे करून दाखवली. दोन लाखाहून अधिक गृहिणींना गॅस, पावणेदोन लाख बेघरांना घरे दिली, राष्ट्रीय महामार्गासह गावागावातील कॉंक्रिटिकरण करून दळणवळणाचा विकास केला. त्या कामांच्या बळावर त्यांनी दिल्लीच्या वर्तुळात आपले निराळे स्थान निर्माण केले आहे. सलग सात वेळा संसद रत्न पुरस्काराने सन्मानित होणाऱ्या खानदेशातील त्या पहिल्या महिला खासदार आहेत. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर धन्यवाद प्रस्ताव मांडणारे भाषण संसदेत करण्याची संधी मिळालेल्या त्या पहिल्या युवा खासदार आहेत. जल जीवन मिशन आणि राष्ट्रीय महिला सुरक्षा सारख्या देशपातळीवरील समित्यांमध्ये अध्यक्षपदी राहिलेल्या व विदेशात जास्तीत जास्त अभ्यास दौरे करणाऱ्या पहिल्या महिला खासदार म्हणून सुद्धा संपूर्ण खानदेश त्यांच्याकडे पाहतो. हे सर्व लक्षात घेता भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांच्यातील अभ्यासू आणि जिज्ञासू प्रतिनिधीचा गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता आहे. त्यांच्यातील धाडसी युवा नेतृत्वाला आणि कार्यक्षमतेचा परिचय मागील दहा वर्षात झालेला आहे त्याचा लाभ राष्ट्रीय पातळीवरील पक्ष कार्यासाठी कसा करून घेता येईल. या दृष्टिकोनातून पक्षाच्या वरिष्ठांनी विचार करावा आणि त्यांना तेवढ्या ताकदीची संधी द्यावी, ही सामान्य जनतेतून उमटणारी भावना आहे. राष्ट्रीय पातळीवरील अशी संधी डॉ.हीना गावित यांना लवकरच प्राप्त होवो आणि त्यांच्या हातून पुन्हा चमकदार कार्य घडत राहो, हीच त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने जिल्हावासीयांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा!

**– डॉ.शशिकांत वाणी,**
प्रदेश सदस्य, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टी

# नळजोडण्या तुटल्याने गटारीचे पाणी जलवाहिन्यांमध्ये!

## घाण पाणी प्यायल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात, शहादा पालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष

**शहादा । ता. प्र.**

शहादा नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या भोंगळ कारभारामुळे शहादा शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. घाण पाटचारी व गटारींमध्ये पाणीपुरवठ्याचे नळ जोडण्या तुटल्याने पाणी वाया तर जातच आहे, मात्र पाटचारी व गटारीचे घाण पाणी त्या तुटलेल्या नळ जोडण्यांमधून परत जल वाहिन्यांमध्ये जात असल्याने पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर ते घाण पाणी शहरवासियांना पिणे भाग पडत आहे. परिणामी नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

डोंगरगाव रोडवरील शहादा न्यायालयाला लागुन पाटबंधारे विभागाची पाटचारी आहे. या पाटचारित शहरातील सांडपाणी सर्रासपणे सोडले जाते. या पाटचारित नेहमीच घाण व दुर्गंधीयुक्त दुषित पाणी साचलेले राहते. याच पाटचारित शहादा न्यायालयासमोर व न्यायालयाला लागूनच असलेल्या रिकामे पडलेल्या जुन्या तहसीलदार निवासाच्या समोर दोन ठिकाणी नळ जोडण्या तुटलेल्या आहेत. पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर हे पाणी पाटचारीत वाहत राहते. मोठ्या प्रमाणात पाणी



वाया तर जातेच परंतू पाणीपुरवठा बंद झाल्यानंतर हे दूषित पाणी परत नळाद्वारे जलवाहिन्यांमध्ये जाते. ते जलवाहिन्यांमधे साचुन राहते. पुन्हा पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर तेच दूषित पाणी नागरिकांना नळाद्वारे पोहचविली जाते. आरोग्याला अगदी घातक ते दूषित पाणी पिणे शहरवासीयांना भाग पडते. परिणामी शहरवासीयांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ही स्थिती आजकालची नसून सुमारे दोन तीन वर्षांपासून या जलवाहिन्या तुटलेल्या अवस्थेत आहेत. अधिकारी व पाणीपुरवठ्याच्या कर्मचाऱ्यांच्या ते लक्षात आले नसावे हे शक्य नाही ते लक्षात आल्यानंतरही नळ जोडण्या दुरुस्त केल्या जात नाहीत ही गंभीर बाब आहे.

शहादा नगरपालिकेमार्फत शहादा शहरवासीयांना शुद्ध फिल्टर पाणी मिळावे यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करून जलशुद्धिकरणचे मोठे प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहे. या प्रकल्पाद्वारे शहरवासीयांना किती प्रमाणात शुद्ध फिल्टर पाणी मिळते हा विषय प्रश्नांकित असला तरी प्रत्यक्षपणे शहरातील गटारी व पाटचाऱ्यांमध्ये तुटलेल्या जलवाहिन्या बंद केल्या जात नसल्यामुळे त्या तुटलेल्या जलवाहिन्यात दूषित पाणी जाऊन ते शहरवासीयांना पिणे भाग पडत असल्याने शहरवासियांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

शहादा नगरपालिकेत गेल्या अडीच वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून प्रशासक कारभार पाहत आहे. एकंदरीत शहादा नगरपालिकेत प्रशासकाची सत्ता आहे. शहरातील नेते मंडळी व पुढाऱ्यांच्या हातात सत्ता नसल्याने शहादा शहराकडे त्यांचे प्रचंड दुर्लक्ष झाले आहे. शहरातील मूलभूत सुविधा, नागरिकांच्या अडी अडचणी, समस्या आदी बाबिंकडे लक्ष देण्याची त्यांना तूर्तास तरी गरज पडत नाहीये. कुणाचा वचकच राहिला नसल्यामुळे प्रशासकीय कारभाराने ही शहराकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. परिणामी पाणीपुरवठा विभागाच्या या दुर्दम्य भोंगळ कारभाराकडे बघण्याची व तक्रार करण्याची कोणताही नेता व पुढारी तसदी घेत नसल्याचे चित्र आहे. आपल्या हातात सत्ता नसल्याने व नगरपालिकेतून कोणताच लाभ मिळत नसल्याने कदाचित हे चित्र असावे. मात्र जबाबदारी असलेल्या प्रशासकिय अधिकारी, संबंधित विभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तरी किमान जातीने लक्ष घालून शहरातील गटारी व पाटचारींमध्ये तुटलेल्या नळ जोडण्या बंद कराव्यात अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# कात्री येथे स्वच्छता अन् आरोग्यविषयक जनजागृती अभियान

**मोलगी ता.अक्कलकुवा । वार्ताहर**

धडगाव तालुक्यातील कात्री येथे ट्रायबल व्हॉईस फाऊंडेशन या सेवाभवी संस्थेच्या वतीने सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्य विषयक जनजागृती अभियान कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बारकीबाई मोहन वळवी होते तसेच अंगणवाडी सेविका कोमल खुमानसिंग वळवी, अनिता संदिप वळवी, कृषी सहाय्यक सुरेश पावरा व जगदिश पाडवी तसेच ट्रायबल व्हॉईसचे उपाध्यक्ष युवराज खर्डे, प्रकल्प व्यवस्थापक शैलेंद्र वळवी, समन्वयक मनिषा पावरा, किरण पावरा व तसेच गावातील वेगवेगळ्या पाड्यातील अंगणवाडी सेविका, महिला व किशोरवयीन मुली व गावकरी उपस्थित होते.

या प्रसंगी समन्वयक किरण पावरा यांनी कुपोषण या आजाराविषयी व सकस आहार विषयी माहिती दिली. त्यानंतर समन्वयक मनीषा पावरा यांनी किशोवयीन मुलींना संबोधित करताना मासिकपाळी विषयी माहिती दिली व पाळी दरम्यान स्वतः काळजी





कशी घ्यावी या विषयी माहिती व मार्गदर्शन केले.

त्यानंतर संस्थेचे प्रकल्प व्यवस्थापक शैलेंद्र वळवी यांनी सातपुड्यातील डोंगरदऱ्यात व दुर्गम भागात आपले कर्तव्य बजावणाऱ्या अंगणवाडी सेविकांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या कार्याचे कौतुक केले व जबाबदारीने पार पाडत असलेल्या कामाचे आभार व्यक्त केले. शिक्षण, आरोग्य, स्थलांतर, बेरोजगारी, व्यसनाधीनता आणि वेगवेगळ्या मानसिकता असलेल्या लोकांना जाऊन भेटणे, त्यांना चांगल्या सकारात्मक गोष्टी सांगणे, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता विषयी लोकांना जागृत करण्याचे पुण्याचे काम परिसरातील खडतर व दयनीय परिस्थितीत आपली जबाबदारी सकारात्मकतेने पार पाडणाऱ्या अंगणवाडी सेविका म्हणजे सामजिक सैनिक आहात; अशा शब्दांत उपस्थित सेवकांचे कौतुक करण्यात आले.

त्या नंतर अंगणवाडी केंद्रावर कार्य करत असताना येणाऱ्या वेगवेगळ्या अनुभवाविषयी सेविकांकडून चर्चात्मक पद्धतीने जाणून घेण्याचे प्रयत्न करण्यात आले. सूत्रसंचालन आकाश पावरा व अंकुश वसावे यांनी केले. व आभार प्रदर्शन संदिप पावरा यांनी मांडले.

# एकाला चाकूने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न

**नंदुरबार। प्रतिनिधी**

मारहाण केल्याच्या जुन्या भांडणाच्या कारणावरून धारदार चाकूने वार तर लोखंडी रॉडने डोक्यावर मारहाण करीत एकाला जीवेठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना नवपूर येथे घडली. याप्रकरणी दोन जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवापूर येथील लाखाणी पार्कमध्ये राहणारे वैभव सखाराम गावीत यांच्या मित्राने मुकेश उर्फ सुरेश गावीत याच्या भावास मारहाण केली होती. त्या मारहाणीच्या भांडणावरून मुकेश उर्फ सुरेश गावीत व एक अनोळखी विधी संघर्ष बालकाने दुचाकीने (क्र.जी.जे. २६ एडी ५१७१) नवापूर येथे येवून वैभव सुखाराम गावीत यांना मारहाण केली. मुकेश गावीत याने धारदार चाकूने पोटावर वार केला तर अनोळखी विधीसंघर्ष बालकाने लोखंडी रॉडने डोक्यावर मा रहाण करून वैभव गावीत यांना जीवेठार मारण्याचा प्रयत्न केला. याबाबत वैभव सखाराम गावीत यांनी नवापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मुकेश उर्फ सुरेश गावीत (रा.जामलाव ता.नवापूर) वच एक अनोळखी इसम अशा दोघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल सोनवणे करीत आहेत.

# डी.आर.हायस्कूलमध्ये कायदेविषयक साक्षरता शिबिर

**नंदुरबार । दि.४। प्रतिनिधी**





येथील डी.आर.कनिष्ठ महाविद्यालयात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नंदुरबार, जिल्हा वकील संघ राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त विद्यमाने छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिनानिमित्त कायदेविषयक साक्षरता शिबिर घेण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान एम.बी.पाटील (सचिव,जिल्हासेवा प्राधिकरण नंदुरबार) यांनी भूषविले. तसेच ॲड.एच.यू.महाजन यांनी अंमलीपदार्थ विरोधी दिनानिमित्त जनजागृती केली आणि ॲड. सीमा खत्री, माजी विद्यार्थी डी.आर. कनिष्ठ महाविद्यालय यांनी शिक्षणाचा अधिकार या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्राचार्य पंकज पाठक, सूत्रसंचालन प्रा.डॉ.उमेश शिंदे, आभार प्रदर्शन प्रा. हरिश्चंद्र बागुल यांनी केले. कार्यक्रमास उपप्राचार्य एम.एल.अहिरराव उपस्थित होते. कायदेविषयक शिबिरांचा लाभ विद्यार्थ्यांना घेतला. यशस्वीतेसाठी संजय फुलब्रींकर, चतुर ठाकुर यांनी परिश्रम घेतले.

# सुरेखाबेन पाटील यांचे निधन



**नंदुरबार । प्रतिनिधी**

शहादा तालुक्यातील लांबोळा सुरेखाबेन तुकाराम पाटील यांचे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा,पाच मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या लांबोळा येथील प्रगतिशील शेतकरी सखाराम मगन पाटील व सुभाष मगन पाटील यांच्या वहिनी तर ग्रा. पं.सदस्य विशाल तुकाराम पाटील आई होत.

# राजस्थानच्या शिक्षणमंत्र्यांची हकालपट्टी करा!

## भारत आदिवासी पार्टीची मागणी

**मोदलपाडा ता.तळोदा । वार्ताहर**

जिल्हा भारत आदिवासी पार्टीच्या वतीने अक्कलकुवा येथील तहसीलदार दिलीप गांगुर्डे यांच्यामार्फत राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले, राजस्थान सरकारचे शिक्षणमंत्री मदनलाल दिलावर यांनी एक व्हिडिओ जारी केला आहे. ज्यामध्ये असे म्हटले आहे की,जे आदिवासी समाजातील लोक हिंदू धर्मावर विश्वास ठेवत नाहीत, त्यांची सर्व डीएनए चाचणी केली जाईल आणि त्यांच्या वडिलांचा शोध घेतला जाईल. अशा प्रकारची टिप्पणी केल्याने आदिवासी समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहे. याबाबत त्यांच्यावर कारवाई करुन त्यांची हकालपट्टी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

आदिवासी समाजाची स्वतःची संस्कृती, परंपरा आणि बोलीभाषा प्राचीन काळापासून आहे जी इतर सर्व धमपिक्षा वेगळी आहे भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४२ च्या व्याख्येनुसार अनुसूचित जमातीची विशिष्ट ओळख, परंपरा आणि बोलीचा उल्लेख केला आहे, असे असतानाही आदिवासी समाज सर्व धर्माचा आदर करतो कारण कालांतराने आदिवासी समाजाने शांततापूर्ण, अहिंसक आणि सहकार्याची वृत्ती अंगीकारली आहे. त्यामुळे सर्व धर्माच्या गुरूनी आदिवासींना आकर्षित केले आहे. याचा अर्थ आम्ही आदिवासी कोणत्याही धर्माचे आहोत असा होत नाही ५ जानेवारी २०११ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालात, केस क्रमांक १०३६७ आणि २०१० आणि हिंदू विवाह कायदा १९५५ मध्ये, हिंदू विवाह कायदा अनुसूचित जमातींना लागू होणार नाही, असे स्पष्टपणे नमूद केले होते कारण आदिवासींची संस्कृती, परंपरा आणि विवाह संस्कार सर्व धर्मापेक्षा वेगळे आहेत. शिक्षणमंत्र्यांना आदिवासीसाठी केलेल्या घटनात्मक तरतुदींची माहिती नाही ना त्यांना आपल्या संस्कृतीची माहिती आहे. शिक्षणमंत्री असताना त्यांनी आमच्या समाजाच्या शिक्षण पद्धतीबद्दल कधीच बोलले नाही आणि आमच्या डीएनए चाचणीबद्दल ते बोलत आहेत. अशी भडकाऊ भाषा वापरून आमची श्रद्धा आणि ओळख दुखावली गेली आहे. आमची राजस्थान मुख्यमंत्र्यांकडे मागणी आहे की, शिक्षणमंत्र्यांना तात्काळ त्यांच्या पदावरून हटवावे व आदिवासी समाजाची जाहीर माफी मागावी, अन्यथा त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात यावी. आमच्या मागण्यांवर सकारात्मक पुढाकार न घेतल्यास भविष्यात संपूर्ण समाज संघटित होऊन तुमच्या पक्षाला विरोध करेल, सक्त नोंद घेण्यात यावी.



अक्कलकुवा तहसीलदार दिलीप गागुर्डे यांना निवेदन देताना भारत आदिवासी पार्टीचे जिल्हाध्यक्ष ॲड. रुपसिंग वसावे, उपाध्यक्ष खेमसिंग वळवी, प्रदेश युवाध्यक्ष साया वसावे, जिल्हा युवाध्यक्ष ॲड. कुशल बसावे, भिमसिंग पाडवी, अक्कलकुवा तालुकाध्यक्ष, अर्जुन पाडवी अक्कलकुवा युवाध्यक्ष, कृपाल पाडवी युवाध्यक्ष तळोदा, ॲड.रूपसिंग तडवी, अंतरसिंग पाडवी, महेंद्र पाडवी, विवेक वसावे, सुनिता वसावे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**जाहीर नोटीस** दि.२७/०६/२०४

कमलेश देवाजी वंजारी रा.अरिहंत नगर नंदुरबार ता.जि. नंदुरबार यांच्या मार्फत मी अँड.मनोज जी.परदेशी रा.नंदुरबार ता.व जि.नंदुरबार.पक्षकारानी दिलेल्या माहिती व दाखवलेल्या कागदपत्रावरून सदर जाहीर नोटीस द्वारे तमाम लोकांना वपतसंस्था, वितसंस्था, बँक यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णानाची स्थावर मिळकत मौजे जि. नंदुरबार येथील बिनशेती सर्वे नंबर 46/4 मधील सुयोग नगर मधील पश्चिमेकडील अविभक्त हिस्सा असलेला प्लॉट नं 23 एकूण क्षेत्र 176.25 चौ. मी. पैकी 88.125 चौ.मी. (7/12 उताऱ्याप्रमाणे ) प्रत्यक्ष जागेवर 87.20 चौ.मी. त्यात बांधिव क्षेत्र 50.00 चौ.मी. उर्वरित 38.125 चौ. मी. खुला प्लॉट असे एकूण 88.125 चौ.मी. बांधीव मिळकत आहे.

पुर्वेस :- प्लॉट नं 23 पश्चिमेस :- रोड
दक्षिणेस:- प्लॉट नं. 27A उत्तरेस :- रोड

या मिळकतीचे मालक प्रमिला निंबा बोरसे हे असून त्यांच्याशी आमचे आशिल कमलेश देवाजी वंजारी रा. अरिहंत नगर नंदुरबार ता. जि. नंदुरबार खरेदी करणार असून वर नमूद मिळकतीचे जे कोणी कायदेशीर हकदार व हिस्सेदार असतील शिवाय सदर मिळकतीवर कोणीही सावकार किवा पतसंस्था, वितसंस्था, बँक यांची घेणी असल्या बाबत काही कायदेशीर हरकत असल्यास व तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत आपले जवळ असलेल्या कागदपत्रा सहित अँड. मनोज जी. परदेशी यांच्या कडे हरकत नोदवावी सदर मुदतीत कोणीही हरकत नोंदवली नाही तर सदर मिळकतीवर कोणाचीही काही भदणेकायदेशीर हरकत न आल्यास सदरील मिळकत ही निर्वेध व बोजारहित असल्याचे तसेच सदर मिळकतींचे टायटल निर्दोष असल्याचे समजण्यात येईल. अँड. मनोज जी. परदेशी यांच्या कार्यालया व्यतिरिक्त वा अगर अन्य ठिकाणी तसेव परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. येणे प्रमाणे जाहिर नोटीस असे. सदरची जाहीर नोटीसआमच्या मार्फत प्रसिद्ध केली असे

**ॲड.मनोज जी. परदेशी**
पत्ताः- शॉप नं. ०५ शिवकृपा बिल्डींग
पंजाब नॅशनल बँक समोर परदेशीपुरा नंदुरबार
मो.नं.9764371311

शिक्का



**जाहीर नोटीस** दि.२७/०६/२०४

श्री. राकेश पंडित पवार हनुमान नगर कोकणी हिल दुधाळे ता.जि.नंदुरबार यांच्या मार्फत मी अँड. मनोज जी. परदेशी नंदुरबार ता.व जि.नंदुरबार, पक्षकारानी दिलेल्या माहिती व दाखवलेल्या कागदपत्रावरून मदर जाहीर टीम द्वारे तमाम लोकांना वपनसंस्था, चितसंस्था यांना वा जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, गालील प्रमाणे वर्णानाची स्थावर मिळकत मौजे दुधाळे ता. जि. नंदुरबार येथील बिनशेती सर्वे नंबर 45/5 मधील बांधीव प्लॉट नं 23B एकूण क्षेत्र 112.50 चौ.मी. आहे या मानक श्री. राकेश पंडित पवार हे असून सदर मिळकतीचे मागील मालकाने खरेदीखत व एम.आर. हा झाले असून त्याचा खरेदी दस्त क्रमांक 5692/2008 दस्त करून देणार विजय भाईलाल पटेल हे असून दस्त करून घेणार प्रकाश राजाराम पाटील हे असून मदर दस्ताचे मूळ व एम.आर.आर पानीहाळ झाले आहे. दस्त क्रमांक 5984/2008 दस्त करून देणार प्रकाश राजाराम पाटील हे असून दस्त करून घेणार दिपक मगन चौधरी ने हे असून मदर दस्ताचे मूळ खरेद व एम. आर. आर. पावती महाल झाले आहे क्रमांक 1217/2010 दस्त करून देणार दिपक मगन चौधरी वे हे असून दस्त करून घेणार विनोद रमण चौधरी हे असून मदर दस्तावेज बरेखित व एस. आर. आर. पावती महाळ झाले आहे सदर कागदपत्राबद्दल कोणाही माहिती असल्यास व मिळाल्यास सदर वर नमूद मिळकतीचे जे कोणी कायदेशीर हकदार व हिम्मेदार असतील शिवाय सदर मिळकतीवर कोणीही सावकार किंवा पतसंस्था, वित्तसंस्था, बैंक यांची पेणी असल्या व उन काही कायदेशीर हरकत असल्यान व तकार असल्यास त्यांनी मदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 07 दिनाच्या आत आपने जवळ असलेल्या कागदपत्रा सहित अँड. मनोज जी. परदेशी यांच्या कडे हरकत नोदवावी.

सदर मुदतीत कोणीही हरकत नोंदवली नाही तर सदर मिळकतीवर कोणाचीही काही कायदेशीर हरकत न आल्यास सदरील ही निर्वेध व बोजारहित असल्याचे तसेच सदर मिळकतीचे टायटल निर्दोष असल्याचे समजण्यात येईल. अँड. मनोज जी. परदेशी यांच्या कार्यालया व्यतिरिक्तवा अगर अन्य ठिकाणी तसेच परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. येणे प्रमाणे जाहिर नोटीस असे

**ॲड.मनोज जी. परदेशी**
पत्ताः- शॉप नं. ०५ शिवकृपा बिल्डींग
पंजाब नॅशनल बँक समोर परदेशीपुरा नंदुरबार
मो.नं.९७६४३७१३११

शिक्का

# माळीण घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कर्ले येथील डोंगरावर उपाययोजना करा!

## सरपंच सीमा दिनेश ठाकरेंची मागणी

■ दोंडाईचा । प्रतिनिधी



पुणे विभागातील माळीण गावात डोंगर खचल्याने मोठी जीवितहानी झाली होती अगदी तसाच प्रकार कर्ले ता. शिंदखेडा येथे होण्याची भीती येथील सरपंच व ग्रामस्थांनी व्यक्त केली असून यावर तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी कर्ले गावाच्या सरपंच सिमा दिनेश ठाकरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे याबाबत सरपंच यांच्या वतीने ग्रा. पं. चा ठराव आणि पत्र जिल्हाधिकारी कार्यालयात माजी सरपंच गोकुळ बेडसे, पोलिस पाटील प्रफुल्ल पाटील व दिनेश ठाकरे यांनी दिले.

निवेदनात म्हटले आहे की, कर्ले ता.शिंदखेडा हे गाव भल्यामोठया डोंगराच्या पायथ्याशी वसलेले आहे, सदरील डोंगर हे सरकारी गट नं. २०० व २०१ मध्ये या डोंगरावर अवजड असे मोठे-मोठे दगड गेल्या अनेक वर्षापासून आहेत. परंतू प्रत्यक्ष पाहणी केली असता दगडांच्या खाली असलेली मातीची पूर्णपणे झिज झालेली असून हे दगड कधीही मातीतून सुटले तर प्रचंड असा उतार असल्याने ते सरळ गावातील घरांमध्ये घुसतील व प्रचंड अशी मोठी जीवीतहानी व आर्थिक हानी होण्याची संभवना आहे, पुणे विभागातील माळीण पेक्षा भयंकर प्रकार याठिकाणी होण्याचा धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे यावर उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. यासाठी कर्ले ग्रामपंचायतीच्या मासिक सभा दि.२६ जून २०२४ रोजी ठराव केला असून या कामासाठी जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण योजनेतून संरक्षण भिंत तथा अन्य काही उपाययोजना असतील त्या करण्यात येवून गावाला सुरक्षित करण्यात यावे अशी मागणी जिल्हाधिकारी व पालकमंत्री यांना उद्देशुन लिहिलेल्या पत्रात सरपंच सिमा ठाकरे यांनी केली आहे.

# धुळ्यात गुरुवार ठरला आंदोलनाचा दिवस

## रेशन कार्डधारकांना केवायसीत अडचणी, शिवसेनेचा तहसीलदारांना घेराव

■ धुळे । प्रतिनिधी



रेशनकार्ड धारकांना केवायसीत अडचणी येत असल्यामुळे उबाठा शिवसेना गटातर्फे तहसीलदारांना आज घेराव घालण्यात येवून तहसीलदारांशी चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा मंत्रालय तसेच धुळे जिल्हा पुरवठा विभागाकडून सध्या रेशन कार्डचे अपडेशन व केवायसी फॉर्म भरून सर्व रेशन कार्डधारकांची माहिती भरून घेतली जात आहे. अनेक नागरिकांचे रेशनकार्ड हे जुने झाले आहेत तर काहींचे नाव वगळण्यात आलेले आहेत तसेच नवीन रेशन कार्ड धारकांचे ऑनलाईन नोंदणी न झाल्याने अनेक रेशन कार्डधारक शिधा मिळण्यास अपात्र ठरले आहेत,तर हजारो रेशन कार्ड धारकांच्या ऑनलाइन नोंदी शासनाकडून झालेल्या नाहीत या संदर्भात ३० जून पर्यंत सर्व नागरिकांनी आपले रेशनकार्ड केवायसी फॉर्म सह अपडेट करणे गरजेचे आहे. यासाठी अनेक नागरिक रेशन दुकानावर तसेच तहसीलदार कार्यालय धुळे शहर, धुळे तालुका या ठिकाणी गर्दी करीत आहेत. या ठिकाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयाकडून नागरिकांना बेजबाबदार उत्तरे देत आहेत, तसेच या संदर्भात शासनाच्या ई सेवा केंद्र चालकांकडून देखील नागरिकांना कुठल्याही प्रकारे नोंदी करण्यासाठी असमर्थता दर्शविण्यात आली आहे. कारण महाराष्ट्र राज्य शासनाचा यासंबंधीचे सर्व्हर नेहमीच डाऊन असते, तसेच रेशन चालकांनी रेशनकार्ड ऑपरेशनसाठी व थम्बसाठी फक्त दोन तासांचा अवधी नागरिकांना दिलेला आहे, नागरिक अपडेशनसाठी रेशन चालकाकडे गेल्यावर नेहमी सर्व्हर डाऊन असल्याचे कारण रेशन चालकांकडून दिले जाते त्यामुळे नागरिक वैतागले आहेत, या सर्व तक्रारींच्या पार्श्वभूमीवर आज उबाठा शिवसेना महानगर प्रमुख धीरज पाटील, उपजिल्हाप्रमुख किरण जोंधळे,भरत मोरे, संदीप सूर्यवंशी, कैलास मराठे, कपिल लिंगायत,अजय चौधरी, अमोल ठाकूर यांनी जुन्या तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागात गेले असता तेथे पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार अनुपस्थित असल्याचे दिसून आले. त्यानंतर शिवसैनिकांनी आपला मोर्चा त्या ठिकाणी उपस्थित असलेले तहसीलदार यांच्याकडे वळवला. त्या ठिकाणी सर्व अडचणींवर चर्चा करण्यात येऊन पुरवठा विभागाच्या तहसील कार्यालयातील सुसुत्रता व सुधारणा आणण्यात येईल, तसेच यासंदर्भात ई सेवा केंद्र चालकांना सूचना देण्यात येऊन नागरिकांना कुठल्याही अडचणी निर्माण होऊ देणार नाही असे आश्वासन दिले, तसेच नवीन शिधापत्रधारक व नाव नोंदणी नाव वगळणे केवायसी या संदर्भात रेशन चालकांना देखील योग्य समज दिली जाईल नागरिकांनी दलालांना कुठलेही पैसे देऊन काम करू नये असे आश्वासन तहसीलदार शेवाळे यांनी दिले.

या संदर्भात सोमवारपर्यंत सुधारणा न झाल्यास पुरवठा विभागाच्या विरोधात जन आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा महानगरप्रमुख धीरज पाटील यांनी दिला आहे.

### फक्त तीन दिवस शिल्लक

**केवायसी करण्यासाठी फक्त तीन दिवस शिल्लक आहेत. त्यात दोन तास केवायसी करण्यासाठी रेशनधारकांनी दिले आहेत. केवायसी करायला गेले तर सर्व्हर डाऊन होते, त्यातच दोन तासाचा वेळ संपून जातो. यामुळे ग्राहकाला केवायसी न करता घरी परतावे लागते.**



## राजरत्न सोसायटीत मूलभूत सुविधांचा अभाव

■ धुळे । प्रतिनिधी

शहरातील वार्ड क्र. १६ मधील राजरत्न सोसायटीत नागरी सुविधांचा अभाव असल्याने नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. ३० वर्षांपासून या भागात रस्ते, गटारीही नाहीत. त्यामुळे या भागातील नागरिकांनी आज महापालिकेत निदर्शने केली. यासंदर्भात मनपा प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, राजरत्न सोसायटीची सन १९८९-९० मध्ये स्थापना झाली. सोसायटीतील नागरिक मनपाचा कर नियमतीत भरतात. मात्र, गेल्या ३० वर्षांच्या कालावधीत येथील नागरिकांना मुलभुत सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. यात नागरिकांना नळाचे पाणी मिळत नसल्याने किडनी स्टोन डायरीया, कॉलरा या सारख्या साथीच्या आजारांचा सामना करावा लागत आहे. परिसरात गटारी नसल्याने घाणीचे साम्राज्य पसरले आहे. या घाणीमुळे वेळप्रसंगी नागरिकांमध्ये भांडण होतात. सोसायटीत पक्के रस्ते नसल्याने पावसाळ्यात चिखल होवून अपघात होण्याच्या घटना घडतात. त्यामुळे सर्व्हे नं. ७९/१ ते ३ मधील प्लॉट नं. १९८ समोरील ओपन स्पेसमधून दक्षिण- पूर्व भागातील कोपरा व सर्व्हे नं. ८० / ३ च्या ओपन स्पेसमधील उत्तर पूर्व प्लॉट नं. ७ च्या बाजुने कमीत कमी ६ मीटर रूंद रस्ता हा सव्र्व्हे क्र.८० / ३ मधील मुख्य ६ मिटर रस्त्याला जोडण्यात यावा, असे निवेदनात म्हटले आहे.

## पालक धुळ्यात पण पाल्यांची नावे नाशकात, रेशन कार्डधारकांना न्याय द्या - अॅड. पंकज गोरे

■ धुळे । प्रतिनिधी

धुळे शहरात रहिवास असलेल्या काही रेशनकार्ड धारकांची नावे आहेत. मात्र, त्यांच्या पाल्यांची नावे नाशिकमध्ये असल्याचा अफलातून प्रकार समोर आला आहे. या प्रकाराची दखल घेत आज युवासेनेचे विस्तारक अॅड. पंकज गोरे यांनी तक्रारदारांसह निवासी उपजिल्हाधिकारी श्री. गावंडे यांची प्रत्यक्ष भेट घेतली. तसेच रेशनकार्डधारकांना योग्य न्याय देण्यासंदर्भात निवेदन दिले आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त युवा सेनेचे विस्तारक अॅड. पंकज गोरे हे मतदार नोंदणी अभियानासह रेशनकार्ड, आधारकार्ड नोंदणी व त्यातील दुरूस्ती, शासकीय योजनांचा लाभ असे एकत्रित अभियान राबवित आहेत. या अभियानात धुळे शहरातील रेशनकार्ड धारकांनी समस्यांचा पाढा वाचला. यात बहूतांश रेशनकार्ड धारकांच्या प्रमुखांची नाव नाहीत. काही रेशनकार्डावर पालकांची नावे आहेत तर त्यांच्या पाल्यांची नावे नाशिक शहरात असल्याचा अफलातून प्रकार समोर आला आहे. परिणामी, शासकीय योजनांचा लाभ आई-वडिलांना मिळू शकतो. मात्र, पाल्यांना शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे या प्रकाराची सखोल चौकशी करावी. असे निवेदनात म्हटले आहे.



## सुदीप बेदमुथा व आंचल परदेशी यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

■ धुळे । प्रतिनिधी

श्री विलेपार्ले केळवणी मंडळ संचलित धुळे येथील एसव्हीकेएम अभियांत्रिकी महाविद्यालयात सध्या सुरु असलेल्या शैक्षणिक वर्षात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांच्या सहाय्याने महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागामधून दोन विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती प्राप्त झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निलेश साळुंके यांनी दिली.





महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागामधील सुदीप बेदमुथा या विद्यार्थ्याची इंग्लंड देशातील ऑक्सफर्ड ब्रुक्स विद्यापीठातील एमएससी व्यवस्थापन आणि व्यवसाय विश्लेषण या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झाली असून त्याला या शिक्षणासाठो पाच हजार डॉलर म्हणजेच ४ लाख १७ हजार ३९८ भारतीय रुपये इतकी शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. तसेच आंचल परदेशी हिची इंग्लंड देशातीलच न्युकॅसल विद्यापीठातील एमएससी सप्लाय चेन मॅनेजमेंट या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झाली असून तिला या शिक्षणासाठी चार हजार पौंड म्हणजेच चार लाख २१ हजार ९५९ भारतीय रुपये इतकी शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश

■ धुळे । प्रतिनिधी

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे ३७ (१) (३) अन्वये २४ जून ते ८ जुलै रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. सदरचे आदेश लग्नकार्य, मिरवणुका, तालुका आठवडे बाजार किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत.

## आई महिला केंद्रीय पर्यटन धोरण योजनेची जनजागृती करा!

### उपसंचालक मधुमती सरदेसाई - राठोड यांचे निर्देश

■ धुळे । प्रतिनिधी

पर्यटन संचालनालयामार्फत महिला केंद्रीत आई पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले असून या योजनेची जास्तीत जास्त माहिती शहरी व ग्रामीण भागात होण्यासाठी जनजागृती करावी. अशा सूचना नाशिक पर्यटन संचालनालयाच्या उपसंचालक मधुमती सरदेसाई - राठोड यांनी दिल्या.

आई महिला केंद्रीय पर्यटन धोरण योजनेबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. यावेळी श्रीमती सरदेसाई- राठोड या बोलत होत्या. बैठकीस उपजिल्हाधिकारी संदीप पाटील, जिल्हा अग्रणी बँकेचे मुख्य व्यवस्थापक संजय शर्मा, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे अभिजित काटकर, पर्यटन संचालनाच्या प्रकल्प अधिकारी गायत्री साळुंखे, सोनम पवार, एनजीओ मिनाताई भोसले, हॉटेल व्यवसायीक प्रतिनिधी सुशिल पोपली आदी उपस्थित होते.

पर्यटन क्षेत्रात महिलांमध्ये उद्योजकता आणि नेतृत्वगुण विकसित करण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागामार्फत महिलांच्या सक्षमीकरणासाठी आई महिला केंद्रीत पर्यटन धोरण जाहीर केले आहे. या आई महिला केंद्रीत पर्यटन धोरण योजनाची शहरी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी. जेणेकरुन शहरी व ग्रामीण महिलांना पर्यटन क्षेत्रात सहभाग वाढून त्यांच्या आर्थिक विकासाकरीता एक चांगले साधन ठरु शकेल. या महिला पर्यटन धोरणात महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने महिला उद्योजकता विकास, महिलांकरिता पायाभुत सुविधा, महिला पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य, महिला पर्यटकांसाठी कस्टमाईज्ड उत्पादने, सवलती, प्रवास आणि पर्यटन विकास ही महिलांसाठीच्या पर्यटन धोरणाची पंचसूत्री धोरण राबविण्यात येत असल्याची माहिती मधुमती सरदेसाई - राठोड यांनी दिली.

उपजिल्हाधिकारी श्री.पाटील म्हणाले की, जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिलांचा आई महिला केंद्रीय पर्यंटन योजनेत सहभागासाठी जिल्हा अग्रणी बँकेने त्यांच्या आढावा बैठकीत या योजनेची माहिती द्यावी. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने सुद्धा महिला मेळावे, बचतगटांनी योजनेची माहिती देवून योजनेचा लाभाबाबत अवगत करावे.

## देवरे अभियांत्रिकीत आयईटीई स्टुडंट्स फोरमची स्थापना

■ धुळे । प्रतिनिधी

येथील श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजीराव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयातील ईलेक्ट्रॉनिक्स विभागात आयईटीई स्टुडंट्स फोरमची नुकतीच स्थापना करण्यात आली. सेकंड इयर बी टेक च्या बासष्ट विद्यार्थ्यांनी इन्स्टिटयूट ऑफ ईलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन्स् इंजिनिअर्स या संस्थेचे त्रैवार्षिक सदस्यत्व नुकतेच स्वीकारले आहे. सर्व विद्यार्थी २०२७ पर्यंत सदस्य असतील. या अंतर्गत संस्थेद्वारे विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या तांत्रिक कौशल्यावर आधारित विविध उपक्रमांमध्ये स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध झाली आहे. तसेच या सदस्य विद्यार्थ्यांना आयईटीईद्वारे प्रकाशित होणाऱ्या शोधपत्रिका (जर्नल्स) ऑनलाईन पध्दतीने मोफत उपलब्ध होणार असून त्यांच्या तांत्रिक ज्ञानात वाढ होऊन त्यांना प्रकल्प निर्मिती मध्ये मदत होणार आहे. सदस्यत्व स्विकारलेल्या विद्यार्थ्यांना सदस्यत्व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

# शॉर्ट न्यूज

## सामाजिक न्याय दिवस साजरा



■ शिरपूर । प्रतिनिधी

येथील एच.आर.पटेल कन्या माध्यमिक विद्यालयात छत्रपती शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस.ए.कुरेशी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक एस.जे.पाटील उपस्थित होते. मुख्याध्यापक एस.ए.कुरेशी यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण केले. त्यांनी यावेळी मार्गदर्शन केले. राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत एकूण ३६ विद्यार्थिनी सहभागी झाले होते. वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक कृत्तिका रवींद्र बोरसे, द्वितीय क्रमांक जान्हवी कैलास सोनवणे, तृतीय क्रमांक प्रांजल अमोल सोनवणे आणि अंजली सचिन ठाकरे (तृतीय) आणि उत्प्रेक्षा राजेंद्र सिसोदे हिने पटकावला. सूत्रसंचालन शितल पाटील यांनी केले तर आभार स्मिता नाईक यांनी मानले.

## अमली पदार्थविरोधी दिन



■ धुळे । प्रतिनिधी

शहरातील रामचंद्र केशव चितळे माध्यमिक विद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती, जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन, जागतिक प्रशितन दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी व्यासपीठावर स्वप्निल चव्हाण, मुख्याध्यापक जे. पी. कुयटे, पर्यवेक्षक के. पी. मांडे व एम. एस. तेले आदी उपस्थित होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक श्री के. पी. मांडे यांनी केले. सूत्रसंचालन जे. डी. पाठक यांनी केले. आभार पी. एम. हरणे यांनी मानले.

## सामान्य ग्राहकांना प्रिपेड स्मार्ट मीटर नाही

■ धुळे । प्रतिनिधी

महावितरणातर्फे स्मार्ट मीटर बसविण्याच्या योजनेत सबस्टेशनमधील सर्व फीडरवर तसेच वितरण ट्रान्सफॉर्मर आणि सर्व सरकारी कार्यालयांमध्ये स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहेत. तथापि, सर्वसामान्य ग्राहकांना मात्र प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्यात येत नाहीत. महावितरणाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेनंतर ऊर्जा मंत्रालय, भारत सरकारच्या सुधारित वितरण क्षेत्र योजनेमध्ये (आरडीएसएस) वाहिन्यांचे विलगीकरण, वितरण हानी कमी करणे, वितरण प्रणालीचे सक्षमीकरण आणि स्मार्ट मिटरिंग यांसारखे कार्यक्रम हाती घेतले आहेत. यामुळे महाराष्ट्रातील ग्राहकांना विश्वासार्ह आणि दर्जेदार वीजपुरवठा होण्यास मदत होईल.

## प्रहार जनशक्ती पक्षातर्फे रक्तदान शिबिर



■ धुळे । प्रतिनिधी

राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त कल्याण भवन येथे प्रहार जनशक्ती पक्षातर्फे रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबीरात १०१ बँगांचे संकलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाऊसाहेब हिरे मेडिकल कॉलेजचे डिन डॉ. सयाजी भामरे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून उप सिव्हिल सर्जन डॉ. महेश भडांगे, माजी नगरसेवक राजेश पवार, प्रहार जनशक्ती पक्षाचे धुळे जिल्हा अध्यक्ष अॅड. वसंत बोरसे,जिल्हा उपाध्यक्ष मंदाकिनी गायकवाड, सचिव संजय विभांडिक, नगाव विभाग प्रमुख प्रल्हाद पाटील, म्हसदी विभाग प्रमुख जगन्नाथ देवरे,योगेश पाटील, प्रशांत माळी,प्रशांत येवले,रोहिदास अहिरे,गणेश कोथमिरे आदी उपस्थित होते.

देशदूत
नंदुरबार जिल्हा
शुक्रवार, दि.२८ जून २०२४ पान - ६

**पवित्र कुरआन - सुराह ३६, आयात ६६**

आम्ही इच्छिले तर यांचे डोळे बंद करून टाकू, मग यांनी रस्त्याकडे धाव घेऊन पाहावे, कुठून यांना रस्ता उमगेल?

**सुराह ३१, आयात १५**

परंतु जर त्यांनी तुझ्यावर दबाव आणला की माझ्यासमवेत तू अशा एखाद्याला भागीदार ठरवावेस की ज्याला तू जाणत नाही, तर त्यांचे म्हणणे अजिबात ऐकू नकोस. जगात त्यांच्याशी सद्व्यवहार करीत राहा परंतु अनुकरण त्या व्यक्तीच्या मार्गाचे कर जो माझ्याकडे रुजू झाला आहे. मग तुम्हा सर्वांना परतावयाचे माझ्याकडेच आहे, त्यावेळी मी तुम्हाला दाखवीन की तुम्ही कसली कृत्ये करीत होतात.

**जे.के.पार्क परिवार, नंदुरबार**
**मोफत कुरआन मिळविण्यासाठी संपर्क - ९८९०५६९६५२**

# ७ ग्रॅम सोन्याच्या बाळीसाठी वृद्धाचा कानच कापला

## डोक्यावर वार करुन केला खून, अज्ञात मारेकऱ्याविरुद्ध गुन्हा

**नंदुरबार । दि.२७। प्रतिनिधी**



७ ग्रॅम सोन्याच्या बाळीसाठी ७८ वर्षीय वृद्धाचा कान कापून त्यानंतर डोक्यावर वार करुन जिवे ठार मारण्यात आल्याची घटना बलवंड ता.नंदुरबार शिवारात घडली. याप्रकरणी अज्ञात इसमाविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोली सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, साक्री तालुक्यातील ऐचाळे येथील भटा मखन बोरसे (वय ७८) यांचे बलवंड (ता.नंदुरबार) शिवारात गट नंबर २९६ मध्ये शेत आहे. शेतात त्यांनी पत्र्याचे घर बांधले आहे. त्यांच्या कानात ७ ग्रॅम वजनाची सोन्याची बाळी होती. काल दि.२५ जून रोजी सायंकाळी ४.३० च्या सुमारास ते शेतात आले. रात्री ते पत्र्याच्या घरासमोर खाटेवर झोपलेले असतांना सायंकाळ ते सकाळी ८.३० वाजेदरम्यान अज्ञात मारेकऱ्याने त्यांच्या कानातील सोन्याच्या बाळीसाठी ब्लेडने त्यांचे कान कापले. त्यानंतर कोणत्यातरी वस्तूने त्यांच्या डोक्यावर वार करुन जीवेठार केले.

सदर घटना दि.२६ जून रोजी सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास उघडकीस आली. त्यानंतर पोलीसांचे पथक त्याठिकाणी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा केल्यानंतर भटा बोरसे यांचा मृतदेह जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविला. घटनास्थळी ब्लेड आढळून आले आहे. याबाबत अशोक भटा बोरसे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अज्ञात मारेकऱ्याविरुद्ध भादंवि कलम ३०२, ३९४, ३९७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक निलेश गायकवाड करीत आहेत.

# शिरुड येथे ॲल्युमिनीयम तार चोरी

## दोघांच्याविरोधात गुन्हा, एकास अटक, एक फरार

**शहादा । ता.प्र.-**

शहादा तालुक्यातील शिरूड येथील एका शेतकऱ्याच्या शेतातून परस्पर विजेच्या खांबावरील ॲल्युमिनियमची तार चोरणाऱ्या दोघांविरोधात शहादा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात एक मोटारसायकल घेऊन फरार झाला आहे तर दुसऱ्याला पकडण्यात यश आले. बुधवारी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास ही घटना घडली.

याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शिरूड (ता.शहादा) येथील जगदीश ओंकार पाटील यांच्या शिरुड शिवारातील शेत गट नंबर ३०४ मधील शेतात बुधवारी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास संशयित आकाश न्हानकू रामराजे व राज अरुण कोळी (रा. रामी पथराई, ता. शिंदखेडा) हे शेतकरी जगदीश पाटील यांच्या संमतीशिवाय १४ हजार १६० रुपये किमतीची ३००मिटर लांबीची दोन गाळ्यांची ॲल्युमिनियम धातूची इलेक्ट्रिक तार चोरतांना आकाश बारकू रामराजे याला जागीच पकडले. तर दुसरा राज अरुण कोळी हा मोटरसायकल घेऊन फरार झाला असून विनोद संजय चित्ते विद्युत सहाय्यक वीज वितरण कंपनी यांच्या फिर्यादीवरून भारतीय विद्युत कायदा कलम १३६ प्रमाणे शहादा पोलीस ठाण्यात आकाश रामराजे व राज कोळी या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ तारसिंग वळवी करीत आहेत.

## शहादा येथे कार्यशाळा

**शहादा । ता.प्र.-**

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यावतीने नाशिक विभागातील नगर, नाशिक, धुळे, नंदुरबार व जळगांव जिल्ह्यातील संगणक प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी शहादा येथे एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली नगर, नाशिक, धुळे, नंदुरबार व जळगांव जिल्ह्याचे आय.सी.टी. प्रशिक्षक व जिल्हा समन्वयक उपस्थित होते. नंदुरबार जिल्ह्यात आयसीटी प्रशिक्षण राबविण्यात येत आहे.






# शिंदखेड्यात नेटवर्कमुळे ग्राहक हैराण

## सेवा सुरळीत करा : ग्राहक पंचायत महाराष्ट्रची मागणी; उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

■ शिंदखेडा । प्रतिनिधी

शहरासह संपूर्ण तालुक्यात जिओ कंपनीचे अकार्यक्षम नेटवर्कमुळे ग्राहक हैराण झाले आहे. त्यामुळे कंपनीच्या अधिकाऱ्यांना मोबाईल नेटवर्क सुरळीत करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी शिंदखेडा तालुका ग्राहक पंचायत महाराष्ट्रने केली आहे. याबाबत येथील तहसिल कार्यालयालात उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) रोहण कूवर यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शिंदखेडा तहसिलदार ज्ञानेश्वर सपकाळे उपस्थित होते.




निवेदनात म्हटले आहे की, शिंदखेडा शहरासह तालुक्यात जिओ मोबाईल नेटवर्क कंपनीला घरघर लागल्याचे सध्या दिसून येत आहे. मागील अनेक महिन्यांपासून येथील ग्राहकांना जिओच्या अकार्यक्षम नेटवर्कमुळे विनाकारण प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. सध्या कधी संपूर्ण दिवसभर तर दररोज किमान १० ते १२ तास येथील जिओचे नेटवर्क गायब असते. याला सर्वच ग्राहक कंटाळले आहेत. परिणामी येथील जिओचे हजारो ग्राहक आता जिओलाच गुडबाय करण्याच्या मनस्थितीत आहेत. जिओ कंपनीने तातडीने शिंदखेड्यात आपल्या विस्कळीत नेटवर्कमध्ये सुधारणा करुन ग्राहकांना चांगली सेवा द्यावी, अशी मागणी ग्राहकांमधून केली जात आहे.

शाळा कॉलेजचे विद्यार्थी, शासकीय व खाजगी कार्यालये, बँका, ऑनलाईन सेवा केंद्र यामध्ये नेटवर्कचा अधिक प्रमाणात वापर होत असतो. परंतू नेटवर्क डाऊन असल्यामुळे ऑनलाईन काम करणाऱ्यांना अधिक मनस्ताप सहन करावा लागत आहे.

शिंदखेडा शहर व परिसरात जिओचे असंख्य ग्राहक आहे. मासिक अडीचशे ते तीनशे रुपयांचा रिचार्ज करूनही कंपनी सेवा देण्यास अकार्यक्षम ठरतांना दिसत आहे. ग्राहकांना मानसिक त्रास व आर्थिक भुर्दंड बसत आहे. जिओ कंपनीने लवकरात लवकर आपल्या नेटवर्कमध्ये दुरुस्ती करून जिओची सेवा सुरळीत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर शिंदखेडा तालुका ग्राहक पंचायतचे जिल्हा संघटक प्रा.चंद्रकांत डागा, तालुकाध्यक्ष, माजी प्राचार्य प्रदीप दीक्षित, उपाध्यक्ष रविंद्र ठाकूर, संघटक नलिनी वेताळे, सचिव जी.पी.शास्त्री, कोषाध्यक्ष अशोक राखेचा, सहसचिव एम.ए.देसले, सदस्य जितेंद्र मेखे, प्रा.अजय बोरदे, ॲड. वसंतराव भामरे, छाया पवार, विजया वाघ, संजय पारख, प्रा.भीमराव कढरे, मनोज वारुडे, प्रा.भेय्या मंगळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भाजपा धुळे तालुका खरेदी-विक्री संघाची निवडणूक लढविणार

■ धुळे । प्रतिनिधी

शेतकरी वर्गासाठी महत्वपूर्ण असणाऱ्या खरेदी विक्री संघाची, गेल्या अनेक वर्षात दयनीय अवस्था झाली आहे. या खरेदी-विक्री संघात शेतकरी वर्गाचा हिताचा विचार न करता, नेत्यांनी स्वत:चेच हित साधले आहे. खरेदी-विक्री संघाची गेलेली रया भविष्यात परत आणण्यासाठी व शेतकरी वर्गाला न्याय मिळवून देत, हित जोपासण्यासाठी भारतीय जनता पार्टी, धुळे तालुका खरेदी-विक्री संघाची निवडणूक लढविणार असल्याचे भाजपाने जाहीर केले आहे.

खरेदी-विक्री संघाच्या माध्यमातून तालुक्यातील शेतकरी वर्गास मदतीचा हात मिळावा म्हणून तत्कालीन परिस्थितीत धुळे तालुका खरेदी-विक्री संघाची स्थापना झाली. ज्या उदात्त हेतूने खरेदी-विक्री संघाची स्थापना झाली त्या उद्देशाला मात्र तालुक्यातील नेत्यांनी फाटा दिला. धुळे तालुका खरेदी विक्री संघात शेतकरी हितापेक्षा स्वहितच जास्त जोपासले गेले. खरेदी-विक्री सुरु ठेऊन शेतकरी बंधूना मदत कशी करता येईल हा उद्देश डोळ्यासमोर ठेवणे आवश्यक असतांना मात्र, संघ बंद करुन त्याच्या मालमत्ता भाड्याने कशा देता येतील यातच काही नेतेमंडळींना स्वारस्य दिसते. रसातळाला गेलेल्या धुळे तालुका खरेदी विक्री संघाला जर पुर्नजीवन द्यायचे असेल तर तेथे सत्तांतर करणे गरजेचे आहे.

शेतकरी हिताचा विचार जोपासण्यासाठी व शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघाची निवडणूक लढविण्याचा निर्णय भारतीय जनता पार्टीने घेतला असल्याचे माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ.सुभाष भामरे, भाजपा जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब भदाणे, माजी कृषी सभापती प्रा.अरविंद जाधव, जि.प.सदस्य राम भदाणे, बापू खलाणे, तालुकाध्यक्ष देवेंद्र पाटील, रितेश परदेशी, जि.प.अध्यक्षा धरती देवरे, उत्कर्ष पाटील, संग्राम पाटील, भाऊसाहेब देसले, आशुतोष पाटील, शंकर खलाणे, किशोर सिंघवी, प्रभाकर पाटील, किशोर हालोर आदींनी कळविले आहे.

# खरेदी विक्री सोसा.निवडणुकीत भाजपाला झटका

## जवाहर पॅलनचे दोन उमेदवार बिनविरोध विजयी

■ धुळे । प्रतिनिधी

सहकारी खरेदी विक्री आणि प्रक्रीया सोसायटीच्या लि.धुळेच्या पंचवार्षिक निवडणूकीत आ.कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने आज माघारीच्या शेवटच्या दिवसापासूनच विजयी घोडदौड सुरु केली आहे. त्यात जवाहर शेतकरी विकास पॅनलचे पोपटू शिंदे आणि अरविंद शिरसाठ हे दोन उमेदवार संचालक म्हणून बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे भाजपाप्रणित पॅनलला सुरुवातीलाच झटका बसला आहे.

धुळे सहकारी खरेदी विक्री आणि प्रक्रीया सोसायटीच्या लि.धुळेची संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक होत आहे. दि.७ जूलै रोजी होणाऱ्या निवडणूकिसाठी आज दि.२७ जून रोजी माघारीची अंतिम मुदत होती. विरोधी भाजपा प्रणित पॅनलला दोन जागांवर उमेदवारच मिळाला नाही. त्यामुळे आ.कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखालील जवाहर शेतकरी विकास पॅनलचे दोन उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यात भटक्या विमुक्त मागास प्रवर्गातून पोपट सहादू शिंदे रा.उडाणे आणि अनुसूचित जाती/जमाती मतदारसंघातून अरविंद भालचंद्र शिरसाठ रा.धनुर हे बिनविरोध विजयी झाले आहेत. माघारीच्या दिवशीच आ.कुणाल पाटील यांच्या पॅनलचे दोन उमेदवार बिनविरोध विजयी झाल्याने भाजपाला पुन्हा एकदा दणका बसला आहे. तर आ.कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली जवाहर शेतकरी विकास पॅनलकडून उर्वरीत पंधरा जागांसाठी संभाजी सिधुजी गवळी रा.लळींग, इंद्रिसिंग नथुसिंग गिरासे रा.रामी, रोहिदास विठ्ठल पाटील रा.आमदड, विलास वसंतराव चौधरी रा.फागणे, रमेश दत्तात्रय नांद्रे मोहाडी प्र.डा., कैलास हिंमतराव पाटील रा.कुंडाणे(वरखेडे), भटू गोरख पाटील रा.कापडणे, चुडामण सहादू मराठे रा.वेल्हाणे, बापू नारायण खैरनार रा.मोराणे प्र.ल., दिनकर दौलत पाटील रा.वडजाई, सुनिल यादवराव पाटील रा. सैताळे, लहू काशिनाथ पाटील रा.तरवाडे, सुशिला भगवान चौधरी रा.वलवाडी, अनिता योगेश पाटील रा.अंचाडे, पंढरीनाथ बुधा पाटील रा.मुकटी हे निवडणूक रिंगणात आहेत. उर्वरीत जागांसाठी दि.७ जुलै रोजी मतदान होणार आहे. माघारीअंती आ.कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने विजयी घौडदौड सुरु केल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे. बिनविरोध निवडून आलेल्या नवनिर्वाचित संचालकांचे माजीमंत्री रोहिदास पाटील, आ.कुणाल पाटील यांनी कौतूक केले आहे.

### शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणार - आ.कुणाल पाटील

धुळे सहकारी खरेदी विक्री आणि प्रक्रीया सोसायटीच्या लि.च्या निवडणूकीत जवाहर शेतकरी विकास पॅनलने सक्षम उमेदवार दिले आहेत. त्यामुळे आमचे सर्व उमेदवार प्रंचड मताधिक्क्याने विजयी होतील. खरेदी विक्री सोसायटीच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी उत्कृष्ठ काम सुरु आहे. काँग्रेस आणि महाविकास आघाडीकडून शेतकऱ्यांचे मुलभूत प्रश्न सोडवून त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम आम्ही करीत आहोत. यापुढे खरेदी विक्रीच्या संस्थेतून चांगले काम करुन शेतकऱ्यांसाठी कल्याणकारी निर्णय घेण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आ.कुणाल पाटील यांनी सांगितले.

# वाघाडी येथे विजेचा झटका लागून एकाचा मृत्यू, दुसरा जखमी

■ धुळे । प्रतिनिधी

शिंदखेडा तालुक्यातील वाघाडी बुद्रूक येथे दोन जणांना विजेचा जोरदार झटका बसला. त्यात एकाचा मृत्यू झाला. तर दुसऱ्यावर उपचार सुरू आहेत.

शानाभाऊ मुरलीधर कन्नोर (वय ३५ रा.मेथी ता.शिंदखेडा) असे मयताचे नाव आहे. तो दि.२५ जुन रोजी सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास विज कंपनीचे ठेकदार किशोर पाटील व सुपरवायझर भुषण पाटील यांच्यासोबत अग्रवाल पॉवर लि. यांचे वाघाडी बुद्रूक गावात भवानी मातेच्या मंदिराच्या मागील बाजुस गावठाण लाईन इरिगेशन पोल गाडणे व तार ओढण्याच्या कामासाठी गेलेला होता. दुपारी एक वाजेच्या सुमारास शानाभाऊ कन्नोर व जगदिश पाटील हे दोघे सिमेंट पोल गाडण्याचे काम करीत होते. दोघांनी दोन पोल गाडले. तिसरा पोल उभा करून गाडत असतांना वरच्या बाजुस असलेल्या इलेक्ट्रीक तारेला पोलचा धक्का लागल्याने पोल व तारेमध्ये शॉर्टसर्कीट झाल्याने विजेचा शॉक लागून दोघे बाजुला फेकले गेले. त्यात दोघे जखमी होवून बेशुध्द पडले. त्यांना सुपरवायझर भुषण पाटील, महेंद्र बैसाणे यांनी हिरे रूग्णालयात दाखल केले. जगदीश पाटील याच्यावर उपचार सुरू असून डॉक्टरांनी शानाभाऊ कन्नोर यास तपासणी करून मृत घोषित केले. याबाबत नरडाणा पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद झाली आहे.

# रेशन दुकानदारांचे धरणे आंदोलन

■ धुळे । प्रतिनिधी

रेशनचे धान्य मोजून मिळावे, केवायसीचा मोबदला मिळावा यासह इतर मागण्यांसाठी आज रेशन दुकानदार संघटनतर्फे तहसिल कार्यालयात धरणे आंदोलन करण्यात आले.

याबाबत तहसिलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासकीय धान्य गोदामातून येणाऱ्या धान्याच्या गोणी, वजनात ५० किलो पेक्षा कमी भरत असल्याने धान्य मोजून देण्यात यावे. ई केवायसीचा मोबदला मिळावा. अंत्यदय योजनेतील सातपेक्षा अधिक सदस्य असणाऱ्या शिधापत्रिकांचा समावेश प्राधान्य कुटूंब योजनेत करावा, रेशन दुकानदारांच्या सर्व प्रकारच्या प्रलंबित मार्जीन रक्कम तातडीने अदा करावी, लाभार्थ्यांची संख्या वाढली असली तरी धान्य मात्र तितकेच मिळत आहे. त्यामुळे धान्याचा कोठा वाढवून मिळावा. या आणि इतर मागण्यांसाठी आज धरणे आंदोलन करण्यात आले.


यावेळी संघटेनेचे अध्यक्ष मधुकर पाटील, उपाध्यक्ष विलास चौधरी, हिंमत बागुल, दगा पाटील, खंडेराव गिरासे, के.एम. पटेल, कुष्णा ठेलारी, कोमलसिंग राजपुत, कल्पनाबाई पाटील, मिराबाई वाघ, छायाबाई पाटील, हिरामण पाटील, भटू पाटील, अशोक शर्मा, अनिल शिनकर, एस. व्ही. देसले. सिताराम चव्हाण, अवचीत पाटील, उषाबाई पाटील, एस.एम.कांकरीया, मालूबाई पाटील, उमेशसिंग राजपुत आदी उपस्थित होते.

# आर.सी.पटेल आयएमआरडी बीसीएच्या ५ विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय कंपनीत निवड

■ शिरपूर । प्रतिनिधी

येथील आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित, आय.एम.आर.डी. परिसंस्थेतील बी.सी.ए. विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची भारतातील अग्रनामांकीत टी.सी.एस. इग्नाइट (चेन्नई) या आंतरराष्ट्रीय कंपनीत निवड झाली.

टी.सी.एस. इग्नाइट, चेन्नई येथे प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले होते. या विद्यार्थ्यांसाठी ऑफलाइन पध्दतीने ॲप्टीट्यूड टेस्ट घेण्यात आली होती. त्यानंतर टेक्निकल राउंड आणि ह्युमन रिसोर्स (एच. आर.) राउंड घेण्यात आले. यात ५ विद्यार्थ्यांची वार्षिक २.८० लाख रूपये वेतनावर निवड झाली अशी माहिती आय.



एम.आर.डी. संचालिका डॉ. वैशाली पाटील यांनी दिली. या पाच विद्यार्थ्यांमध्ये बी.सी. ए. अंतिम वर्षातील विद्यार्थी विश्वेश जितेंद्र जोशी, जयेश भिकन पाटील, अनिकेत दिलीप सोनवणे, अनिकेत विलास पाटील, अभिजित चंद्रकांत मोरे यांचा समावेश आहे.

परिसंस्थेच्या संचालिका डॉ.वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनखाली प्लेसमेंटचे आयोजनासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. अर्चना जडे व प्रा. सपना येशी यांनी तसेच डॉ दगडू मराठे व प्रा.दिनेश बोरसे यांचे मार्दर्शन लाभले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी शिक्षणमंत्री आ. अमरिशभाई पटेल, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, सचिव राजगोपाल भंडारी, माजी कुलगुरू डॉ.के.बी.पाटील, परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील, एम.सी.ए. विभागप्रमुख प्रा.मनोज बेहेरे, आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. मनोज पटेल, पदवी विभागप्रमुख डॉ. तुषार पटेल, सर्व प्राध्यापकांनी कौतुक केले.

# मेमूच्या धडकेत एकाचा मृत्यू

■ धुळे । प्रतिनिधी

साचाळीसगाव-धुळेमेमूच्या धडकेत एकाचा मृत्यू झाला आहे. बुधवारी सायंकाळी ही घटना घडली.

धनश्याम पंडीत पाटील (वय ५२ रा. रंजाणे ता. धुळे) असे मयताचे नाव आहे. ते सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास मोहाडी उपनगरातील ब्रिजच्या खाली रेल्वे ट्रकवर उभे होते. रेल्वे ट्रॅकमनने हॉर्न वाजवून देखील ते बाजुला झाले नाही. त्यामुळे ते इंजिनची धडक बसून बाजुला फेकले गेले. त्यांना रेल्वे ट्रॅकमन यांनी जिल्हा रूणालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासणी करीत मृत घोषित केले. खिशात मिळून आलेल्या आधारकार्डवरून त्यांची ओळख पटली. मोहाडी पोलिसात नोंद झाली आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# चक्करबर्डी परिसरात मजुराला मारहाण करीत लुटले, तिघांवर गुन्हा

■ धुळे । प्रतिनिधी

शहरातील चक्करबर्डी परिसरात मजुरास मारहाण करीत तिघांनी त्याच्याकडील रोकड व मोबाईल जबरीने लुटून नेला. याप्रकरणी शहर पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे.

धुळे तालुक्यातील वार येथे राहणारे दादाभाऊ बारकु पारधी (वय ३३) हे दि. २५ जुन रोजी रात्री अकरा वाजेच्या सुमारास सुरत बायपास रस्त्याने पायी जात होते. त्यादरम्यान चक्करबर्डी येथे पाण्याच्या टाकीजवळ दुचाकीवर ट्रीपल सीट आलेल्या तिघा अनोळखींनी त्यांना रस्त्यात अडविले. मारहाण करीत त्यांच्याकडील १ हजार ६०० रूपये व ५ हजाराचा मोबाईल जबरीने हिसकावून नेला. याप्रकरणी तिघा अनोळखींवर गुन्हा नोंद झाला आहे. तपास उपनिरीक्षक सुर्यवंशी करीत आहेत.

**क्राईम**

**अल्पवयीन मुलीचे अपहरण–** साक्री तालुक्यातील शेंदवड येथे राहणाऱ्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले आहे. तिला दि. १८ जुन रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास अज्ञात इसमाने काहीतरी आमिष दाखवून फुस लावून पळवून नेले. याबाबत पिडीत मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून पिंपळनेर पोलिसात अज्ञात आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सुकवद येथे एकाची आत्महत्या–** शिंदखेडा तालुक्यातील सुखवद येथील रहिवासी संजय बंसिलाल भिल (वय ३४) याने आत्महत्या केली आहे. त्याने दि. २६ जुन रोजी गावातील मधुकर पिंताबर पाटील यांच्या शेतात निंबाच्या झाडाला गळफास घेतला. त्यास ग्रामस्थांच्या मदतीने शिंदखेडा ग्रामीण रूग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासणी करीत मृत घोषित केले. याबाबत शिंदखेडा पोलिसात नोंद झाली आहे.

## शॉर्ट न्यूज

### जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन




■ धुळे । प्रतिनिधी

राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे यांनी राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन केले. यावेळी सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी अर्चना भगत तसेच महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांना योगाचे प्रात्यक्षिक



■ शिरपूर। प्रतिनिधी

तालुक्यातील खंबाळे येथील आर.सी.पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योगा दिवस साजरा करण्यात आला. सरस्वती प्रतिमा पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य एन.ई.चौधरी, योग प्रशिक्षक डी.ए.पावरा, सी.एन.पाटील, एस.डी.पाटील यांनी केले. प्राचार्य चौधरी, आर.एल.तवर यांनी मार्गदर्शन केले. डी.ए.पावरा व एस.डी.पाटील यांनी योगासने प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांकडून करून घेतली. सूत्रसंचालन सी.एन.पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जेष्ठ शिक्षक व्ही.एस.बेलदार, डी.ए.पावरा, एस.डी.पाटील, आर.यु.पवार, आर.एल.तवर, एम.झेड.पाटील, व्ही.एन. दोरीक, पी.बी.वाघ, एम.आय.मुसलमान, ए.बी.महाजन, एम.जी.अहिरे, एस.आर.जाधव, एम.के.पावरा, रामचंद्र शिंदे यांनी प्रयत्न केले.

### रंगभरण स्पर्धेला प्रतिसाद



■ बोराडी । वार्ताहर

शिरपूर येथील सौ.सावित्रीताई व्यं रंधे कन्या माध्य व उच्च माध्य विद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांची सुवर्ण महोत्सवी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. मुख्याध्यापिका सौ.सारिका रंधे, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांच्या हस्ते प्रतिमा पुजन करण्यात आले. प्रसंगी राजर्षींच्या जीवनावर आधारित रंगभरण, निबंध व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. त्यात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढण्यात आले. राजर्षींनी पुरोगामी महाराष्ट्राची मुहूर्तमेढ रोवली व त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे, असे विचार मुख्याध्यापकांनी व्यक्त केले. याप्रसंगी एम.एम. पाटील, जाधव व सांस्कृतिक विभागाने परिश्रम घेतले.

### दोंदे कॉलनीत वृक्षारोपण



■ धुळे । प्रतिनिधी

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया आणि अमरदीप मित्र मंडळ यांच्या संयुक्तविद्यमाने देवपुरातील दोंदे कॉलनीत वृक्षरोपण करण्यात आले. यावेळी यावेळी दह फूट उंचीची २५ झाडे लावण्यात आली. यात वड, पिंपळ, कडुलिंब, कदंब, चिंच, करंज या वृक्षांचा समावेश आहे. या उपक्रमास बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे नितीन खिवसरा आणि दादा डोंगरे यांचे सहकार्य लाभले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय वंजारी, मिथुन अहिरराव, मयूर चौधरी, गौरव अमृतकर यांनी परिश्रम घेतले. यावेळी श्री. महाजन, विलास चौधरी, जे.आर.पाटील, बागुल, दत्ता सरोदे आदी उपस्थित होते. वाढत जाणारा तापमानाचा पारा लक्षात घेता प्रत्येकाने झाडे लावण्याची गरज आहे.




# उद्धव ठाकरे-देवेंद्र फडणवीस एकाच लिफ्टमध्ये : अधिवेशनाचा पहिला दिवस गाजला

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या गुरुवारच्या पहिल्या दिवशी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विधानभवनातील लिफ्टमध्ये एकत्र आले. दोघेही मिळून वरच्या मजल्यावर गेले. यामुळे राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले. यावेळी दोघांनी एकमेकांशी संवाद साधल्याने ठाकरे आणि फडणवीस यांच्यातील राजकीय कटुता कमी झाल्याचे दिसले.

लिफ्टमध्ये एकत्र आल्याबद्दल पत्रकारांनी उद्धव ठाकरे यांना विचारले असता, अनेकांना वाटलं असेल ना ना करते प्यार तुम्ही से कर बैठे.पण ती योगायोगाने झालेली अनौपचारिक भेट होती. लिफ्टच्या भिंतींना कान नसतात. त्यामुळे पुढील गुप्त चर्चा लिफ्टमध्येच करू असे मिश्किल उत्तर त्यांनी दिले. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ



शिंदे यांनी या प्रकरणावर त्यांची लिफ्ट सहाव्या मजल्यावर म्हणजे मुख्यमंत्र्यांचे मंत्रालयातील दालन ज्या मजल्यावर आहे तिथपर्यंत पोहोचू शकणार नाही. दोन वर्षांपूर्वी ते काँग्रेसच्या लिफ्टमध्ये शिफ्ट झाल्याने आम्ही जनतेच्या लिफ्टमध्ये आल्याचा टोला लगावला आहे.

विधिमंडळ अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी लिफ्टचा विषय गाजला. विधान परिषद सभागृहात जाण्यासाठी उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस हे आज विधानभवनाच्या लिफ्टमध्ये एकत्र आले. उद्धव ठाकरे हे वरच्या मजल्यावर जाण्यासाठी लिफ्ट जवळ उभे होते. त्याचवेळी तिथे देवेंद्र फडणवीस देखील आले. तेव्हा दोन्ही नेत्यांनी एकमेकांना नमस्कार केला. दोघे तिथे एकमेकांशी बोलले, त्यानंतर दोन्ही नेते लिफ्टमध्ये शिरले. त्यांच्यासोबत मिलिंद नार्वेकरही होते.

यावेळी या दोन्ही नेत्यांमध्ये संवाद झाल्याचे सांगितले जाते. या लिफ्टमधील भेटीने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. राज्यात गेल्या काही वर्षांत ज्या वेगवान राजकीय घडामोडी घडल्या. त्यानंतर आताच्या लोकसभा निवडणूक निकालानंतर या दोन्ही नेत्यांच्या आजच्या भेटीने अनेक चर्चा सुरू झाल्या आहेत.

**लिफ्टनंतर चंद्रकांतदादांचे चॉकलेट**

दरम्यान, भाजपचे नेते चंद्रकांत पाटील यांनी उद्धव ठाकरे आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची आज विधानभवनात भेट घेतली. यावेळी चंद्रकांत पाटील यांनी उद्धव ठाकरे आणि दानवे यांना चॉकलेट दिले. चंद्रकांत पाटील स्वत:हून उद्धव ठाकरे यांना भेटायला गेल्याने आणि चॉकलेट दिल्याने अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी हा विषय सुद्धा चर्चेचा बनला.


## उपांत्य फेरीत सात वेळा पराभूत

# द.आफ्रिका पहिल्यांदाच अंतिम फेरीत

**त्रिनिदाद । वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेने टी-२० विश्वचषक २०२४ च्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. उपांत्य फेरीत अफगाणिस्तानचा ९ विकेट्स राखून पराभव केला. अफगाणिस्तानचा डाव ११.५ षटकात ५६ धावांवर आटोपला. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेने केवळ १ गडी गमावून लक्ष्य गाठले. दक्षिण आफ्रिकेने पहिल्यांदाच अंतिम फेरीत धडक मारली आहे. दक्षिण अफ्रिकेवर आतापर्यंत चोकर्सचा टॅग होता, तो त्यांनी पुसुन काढला आहे. तसेच तब्बल ३२ वर्षांनंतर दक्षिण अफ्रिकेचा संघ विश्वचषकाच्या अंतिम फेरीत दाखल झाला आहे.

उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी मारक कामगिरी केली. त्रिनिदादमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात आफ्रिकन गोलंदाजांनी अफगाणिस्तानला ५६ धावांवर ऑलआउट केले. अफगाणिस्तानच्या एका फलंदाजाने दुहेरी आकडा गाठला. अजमतुल्ला १० धावा करून बाद झाला. सलामीवीर गुरबाजला खातेही उघडता आले नाही. इब्राहिम झद्रान २ धावा करून बाद झाला. या सामन्यात अफगाणिस्तानची फलंदाजी खराब झाली. दक्षिण आफ्रिकेकडून मार्को जॅनसेनने ३ षटकांत १६ धावा देत ३ बळी घेतले. शम्सीने १.५ षटकात ६ धावा देत ३ बळी



घेतले. रबाडाने ३ षटकांत १४ धावा देत २ बळी घेतले. तर नॉर्खियाने ३ षटकांत ७ धावा देत २ गडी बाद केले. मार्को जॉन्सनने दक्षिण आफ्रिकेला पहिली विकेट दिली. त्याने अफगाणिस्तानचा सलामीवीर गुरबाजला शून्यावर बाद केले होते.

**अंतिम फेरीत मारली धडक**

दक्षिण आफ्रिकेसाठी आतापर्यंतचा विश्वचषकातील प्रवास सोपा राहिलेला नाही. दक्षिण अफ्रिकेला आतापर्यंत उपांत्य फेरीत ७ वेळा पराभवाला सामोरे जावे लागले आहे. यामुळे संघाला चोकर्स म्हणूनही उल्लेख करण्यात येत होता. मात्र हा ट्रग आता दक्षिण अफ्रिकेने फुसण्याचा प्रयत्न केला आहे. १९९२ च्या उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेचा इंग्लंडकडून पराभव झाला होता. यानंतर १९९९ मध्ये ऑस्ट्रेलियाचा पराभव झाला. २००७ मध्येही ऑस्ट्रेलियाचा पराभव झाला होता. यानंतर २००९ मध्ये पाकिस्तानचा पराभव झाला. भारताने २०१४ मध्ये दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला होता. २०१५ मध्ये न्यूझीलंडकडून त्याचा पराभव झाला होता. यानंतर २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध पराभव पत्करावा लागला होता.

**दक्षिण अफ्रिका संघाची कामगिरी**

साखळी फेरीत दक्षिण अफ्रीकाने सर्व सामने जिंकत सुपर ८ मध्ये प्रवेश मिळवला. त्यांनी नेदर्लंड, बांग्लादेश आणि नेपाळचा पराभव केला. त्यानंतर सुपर ८ मध्येही आफ्रिका संघ अजेय राहिला. त्यांनी अमेरिका, इंग्लंड आणि वेस्ट इंडिजचा पराभव केला. त्यानंतर आज उपांत्य फेरीत अफगाणिस्तानविरुद्ध ९ विकेट्सने एकतर्फी विजय मिळवला


**अफगाणिस्तानचा पराभव**

त्रिनिदादच्या ब्रायन लारा स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला, जो त्यांच्यासाठी पूर्णपणे चुकीचा ठरला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या अफगाणिस्तानचा संघ ११.५ षटकांत केवळ ५६ धावांवर सर्वबाद झाला. या काळात मार्को यानसेन आणि तबरेझ शम्सी यांनी संघाकडून सर्वाधिक प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. त्यानंतर लक्ष्याचा पाठलाग करताना आफ्रिकेने ८.५ षटकांत १ गडी गमावत ६० धावा करून विजय मिळवला.

# भारत हिंदू राष्ट्र नाही : अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन यांचे विश्लेषण!

**शिकागो । वृत्तसंस्था**

भारतातील जगविख्यात अर्थतज्ज्ञ आणि नोबेल पुरस्कार मिळविणारे अमर्त्य सेन हे आपल्या परखड मतांसाठी ओळखले जातात. अमर्त्य सेन यांनी भारतातील वास्तवाबाबत अनेकदा मतप्रदर्शन केलेलं आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीवरून त्यांनी सत्ताधारी भाजपाला टोला लगावला. लोकसभेच्या निकालांमुळे भारत हे हिंदू राष्ट्र नाही, हे स्पष्ट झाले आहे, असे मोठं विधान त्यांनी केलं. भारतासारख्या धर्मनिरपेक्ष देशात एक सर्वसमावेशक संविधान असताना आपल्या पुढाऱ्यांनी राजकीय उदारमतवाद दाखवायला हवा, अशीही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



माध्यमांशी बोलताना अमर्त्य सेन यांनी विविध मुद्यांवर भाष्य केले, भारताला हिंदू राष्ट्र बनविण्याची कल्पना मला योग्य वाटत नाही. भारत हे हिंदू राष्ट्र नाही, हे लोकसभा निवडणुकीच्या निकालातून स्पष्ट झाले आहे, असे विधान त्यांनी केलं.

९० वर्षीय अमर्त्य सेन यांनी विरोधी पक्षातील नेत्यांना न्यायालयीन सुनावणीशिवाय तुरुंगात टाकण्याच्या पद्धतीबद्दलही नापसंती व्यक्त केली. प्रत्येक निवडणुकीनंतर काहीतरी बदल होईल, अशी अपेक्षा आपण ठेवतो. गेल्या काही निवडणुकांनंतर देशात काय झाले, हे आपण पाहिले. काही नेत्यांना कायदेशीर प्रक्रियेशिवाय तुरुंगात टाकले जात आहे. गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी वाढत चालली आहे. हे सर्व थांबायला हवे, अशी अपेक्षाही अमर्त्य सेन यांनी व्यक्त केली.

याबाबतचा दाखला देताना ते म्हणाले की, माझ्या लहानपणी ब्रिटिश राजवटीत मी या गोष्टी पाहिल्या होत्या. न्यायालयीन सुनावणीला टाळून नेत्यांना तुरुंगात डांबले जात होते. मी लहान असताना पाहिले की, माझे अनेक नातेवाईक कायदेशीर प्रक्रियेशिवाय तुरुंगात टाकले गेले होते. मला वाटतं भारत यापासून कधीतरी मुक्त होईल. काँग्रेसच्या सरकारच्या काळातही हे बदलले नाही, तो त्यांचा दोष होता. पण सध्याच्या सरकारच्या काळात ही पद्धत अधिक प्रचलित झाली आहे, अशा शब्दांत सेन यांनी काँग्रेस आणि भाजपावर टीका केली.

**देशाची ओळख झाकण्याचा प्रयत्न**

नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन यांनी भाजपाच्या अयोध्येतील पराभवाबाबतही भाष्य केलं. ते म्हणाले, राम मंदिर निर्माणावर बराच पैसा खर्च करण्यात आला. यातून भारत हे हिंदू राष्ट्र आहे, हे दाखविण्याचा प्रयत्न झाला. महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या काळातही असा प्रयत्न कधी झाला नाही. भारताची खरी ओळख झाकण्याचा हा प्रयत्न होता, त्यात बदल झाला पाहिजे.

# विश्वचषक विजेता संघ होणार मालामाल

**गयाना । वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक पटकावणारा संघ मालामाल होणार आहे. टी-२० विश्वचषकाची एकूण बक्षिसांची रक्कम ५.६ दशलक्ष डॉलर्स आहे. जर आपण भारतीय रुपयांमध्ये किंमत पाहिली तर ती अंदाजे ४६.७७ कोटी रुपये येते. त्याचबरोबर विश्वचषक जिंकणाऱ्या संघाला १.६ दशलक्ष डॉलर्स मिळतील. भारतीय रुपयांमध्ये ही किंमत १३.३६ कोटी रुपये आहे. तर उपविजेत्याला ६.६८ कोटी रुपये मिळतील. म्हणजेच टी-२० विश्वचषक अंतिम सामन्यात पराभूत होणाऱ्या संघावरही पैशांचा वर्षाव होणार आहे. टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत पराभूत झालेल्या संघांना ३.३२ कोटी रुपये मिळतील. तर सुपर-१२ टप्प्यातून बाहेर पडलेल्या संघांमध्ये ५.८५ कोटी रुपये वितरित केले जातील. म्हणजेच ही रक्कम सर्व संघांमध्ये विभागली जाईल.

# दरडोई उत्पन्नात महाराष्ट्राची घसरण

**मुंबई । प्रतिनिधी**

उद्योग आणि आर्थिक गुंतवणुकीत महाराष्ट्राशी स्पर्धा करणाऱ्या गुजरातने दरडोई उत्पन्नात महाराष्ट्राला मागे टाकल्याची धक्कादायक बाब राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालातून समोर आली आहे. २०२२-२३ मध्ये महाराष्ट्र राज्य दरडोई उत्पन्नात पाचव्या स्थानी होते. मात्र, वर्षभरात या स्थानावरून घसरण होत महाराष्ट्र सहाव्या स्थानावर फेकला गेला असून गुजरातने दरडोई उत्पन्नात पहिल्या पाचमध्ये स्थान मिळवले आहे. राज्याच्या कृषी आणि संलग्न कार्य क्षेत्रात १.९ टक्के वाढ अपेक्षित असताना गेल्या वर्षीच्या तुलनेत तृणधान्य, कडधान्ये, तेलबिया, ऊस यांच्या उत्पादनात अनुक्रमे २३ टक्के, १० टक्के, २ आणि १७ टक्के इतकी घट अपेक्षित असल्याने राज्याची चिंता वाढली आहे.

सन २०२३-२४ मध्ये देशाच्या आणि राज्याच्या अर्थसव्यस्थेतील वाढ प्रत्येकी ७.६ टक्के वाढ असेल, असा अंदाज पाहणीत व्यक्त करण्यात आला आहे. सुधारित अंदाजानुसार २०२३-२४ साठी राज्याची महसुली जमा ४ लाख ८६ हजार १६ कोटी असून महसुली खर्च ५ लाख ५ हजार ६४७ कोटी आहे. गेल्या आर्थिक वर्षात फेब्रुवारीपर्यंत प्रत्यक्ष महसुली खर्च ३ लाख ३५ हजार ७६१ कोटी रुपये असल्याचे अहवालात म्हटले आहे. याशिवाय राज्यावरील कर्जात १६.५ टक्के इतकी वाढ झाल्याची माहिती देण्यात आली आहे. मार्च २०२४ अखेर राज्यावरील कर्जाचा आकडा ७ लाख ११ हजार २७८ कोटी रुपयांवर पोहचला असून कर्जाचे प्रमाण स्थूल राज्य उत्पन्नाच्या २५ टक्के आहे. मार्च २०२३ अखेर राज्यावर ६ लाख ४९ हजार ६९९ कोटी रुपये इतके कर्ज असेल, असा अंदाज गेल्या वर्षी वर्तविण्यात आला होता.

## विधिमंडळात आर्थिक पाहणी अहवाल सादर

### सिंचनाची टक्केवारी नाही

सिंचन घोटाळ्याचे आरोप होऊन आणि त्याची चौकशी होऊन जवळपास १४ वर्ष उलटली तरी राज्यातील सिंचनाची टक्केवारी देण्यात राज्य सरकारकडून टाळाटाळ केली जात आहे. सन २०१२ पासून आर्थिक पाहणी अहवालात राज्यातील सिंचनाची टक्केवारी दिली जात नाही. यावर्षीच्याही अहवालातही आकडेवारी गुलदस्त्यात आहे. मात्र, राज्यातील मोठ्या, मध्यम, आणि लघु पाटबंधारे प्रकल्पांद्वारे जून २०२२ अखेर ५५.६० लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली. सन २०२२-२३ मध्ये प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र ४२.३३ लाख हेक्टर क्षेत्र होते. पंतप्रधान कृषी सिंचन योजनेच्या अंतर्गत सन २०२२-२३ पर्यंत सुमारे १०. ७६ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले. तसेच २०२२-२३ मध्ये या योजनेच्या अंतर्गत १ लाख ७३ हजार ४३ पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ५११ कोटी ९८ लाख रुपयांचे अनुदान जमा करण्यात आल्याची माहिती अहवालात देण्यात आली आहे.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या गुरुवारच्या पहिल्या दिवशी सन २०२३-२४ या वर्षाचा आर्थिक पाहणी अहवाल सादर करण्यात आला. उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनी हा अहवाल दोन्ही सभागृहात मांडला. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्याचा सन २०२४-२५ या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी आर्थिक पाहणी अहवालातून राज्य दरडोई उत्पन्न आणि कृषी उत्पादनातील घट याबाबत नकारात्मक चित्र समोर आल्याने अधिवेशनात विरोधी पक्षाच्या हाती आयते कोलीत सापडले आहे.

राज्याची आर्थिक सुस्थिती स्पष्ट करणाऱ्या घटकांपैकी एक असलेल्या दरडोई उत्पन्न या निकषात तेलंगणा हे राज्य देशात अव्वल ठरले आहे. कर्नाटकला मागे टाकत तेलंगणाने दरडोई उत्पन्न वाढीत बाजी मारली आहे. दरडोई उत्पन्नात तेलंगणा पाठोपाठ कर्नाटक, हरियाणा, तामिळनाडू आणि गुजरात असा क्रमांक लागतो. महाराष्ट्र सहाव्या स्थानी असले तरी २०२२-२३ च्या तुलनेत राज्याच्या दरडोई उत्पन्नात वाढ झाली आहे. २०२१-२२ मध्ये दरडोई उत्पन्न २ लाख १९ हजार ५७३ रुपये होते ते वाढून २०२२-२३ मध्ये २ लाख ५२ हजार ३८९ रुपये झाले आहे. २०२३-२४ मध्ये दरडोई उत्पन्न २ लाख ७७ हजार ६०३ रुपये असेल, असा अंदाज अहवाला व्यक्त करण्यात आला आहे.

राज्यात गेल्या वर्षी सर्वदूर समाधानकारक पाऊस होऊनही धान्य उत्पनादात घट अपेक्षित आहे. २०२३-२४ च्या खरीप हंगामात राज्यात १५५ ६४ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली. तथापि, मागील वर्षाच्या तुलनेत तृणधान्य, कडधान्य, तेलबिया आणि ऊस यांच्या उत्पादनात घट अपेक्षित असून कापसाच्या उत्पादनात मात्र ३ टक्के वाढ अपेक्षित धरण्यात आली आहे. रब्बी हंगामातही मागील वर्षाच्या तुलनेत तृणधान्य तसेच कडधान्यात अनुक्रमे पाच आणि चार टक्के घट अपेक्षित आहे. कृषी उत्पादनाची आकडेवारी काळजीत टाकणारी असली तरी कृषी आणि संलग्न क्षेत्र, उद्योग आणि सेवा क्षेत्रात अनुक्रमे १.९, ७.६ आणि ८.८ टक्के इतकी वाढ अपेक्षित आहे.

**विधीलिखित**

**सुरेशराव बोरकर,**
**ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय, रावेर.**
**मो. : ९८५००१५५५८**

शुक्रवार, दि. २८ जून २०२४

***-*-*-* दैनंदिन राशिभविष्य *-*-*-***

**मेष** – कंटाळवाणा दिवस आज असेल.
**वृषभ** – अविवाहितांना स्थळे प्राप्तीचे योग आहेत.
**मिथुन** – पाव्हणे मंडळीशी वादाची शक्यता.
**कर्क** – नवीन कार्यारंभ भाग्यकारक ठरेल.
**सिंह** – सांसारीक जबाबदारी घ्यावी लागेल.
**कन्या** – व्यापारीवर्गास अती उत्तम दिवस असेल.
**तूळ** – विद्यार्थीवर्गास अती उत्तम दिवस.
**वृश्चिक** – कौटूंबीक कार्यात सहभागी व्हाल.
**धनू** – कर्तव्यात रममाण व्हाल.
**मकर** – नवीन नौकरीचे शोधात रहाल.
**कुंभ** – आज सर्व मनासारखे घडेल.
**मीन** – भाग्य एका बाजूला तर मन दुसरे बाजुला.




देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करुन देशदूत कार्यालय, अमर चित्र मंदिर चौक, नंदुरबार-४२५४१२ येथे प्रसिध्द केले. ● **व्यस्थापकीय संपादक : विक्रम सारडा.** ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: नंदुरबार-२२११०१, जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४. **RNI.No. 69123/1998.** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)

cmyk